वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५९९ विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ९/३/२०२१

---

१)प्रस्तावाचा विषय :प्रभाग समिती 'सी' मधील विरार (पू) प्रभाग क्र.१ मध्ये शिरगांव येथे शिरगांव ते खंदरपाडा पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.६९,९६,९८७/-

३) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.११४, दि.२८/०४/२०१७

४)तांत्रिक मान्यता व अंदाजत्रकीय रक्कम :- मा.शहर अभियंता प्र.क्र.८/५६,दि.१३/१२/२०१७

रु.६९,९६,९८७/-

५) जाहिर निविदा सुचना :- १) दै.वार्ताहर ५) दै.इकोनॉमिक टाईम्स
२) दै. हमारा महानगर ६) दै.फ्री प्रेस जर्नल
३) दै. दबंग दुनिया ७) दै.मुंबई चौफेर
४) दै .नरवीर चिमाजी

६) ई -निविदा प्राप्त :-दि.१७/०७/२०१९

७) ई-निविदा उघडल्या [प्रथम लखोटा] :- दि. २० /०७ /२०१९

[द्वितीय लखोटा] :- दि. २०/१२/२०१९

८) प्राप्त निविदांची संख्या :- ३

९) प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :-मा.शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षो	निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरीटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१.	मे. जय भवानी इन्फ्रास्ट्रक्चर	१९.०० % जास्त दराने		L -३
२.	मे. मेघना एंटरप्रायजेस	-३.४ ५% कमी दराने		L -२
३.	मे.राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.	-९.०० % कमी दराने		L -१

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकापेक्षा ९.००%कमी दर** हा तुलनात्माकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे. तरी **मे.राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा ९.००% कमी दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्या बरोबर संविदा करण्यांस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

ठराव :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया_ **मे.राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा ९.००%कमी दराची** निविदा लघूत्तम असून या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देऊन त्या संबंधित पुढील कार्यवाहीस मंजुरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ५९२ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ९ /३/२०२१

---

१)प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'सी' मधील विरार (पू) प्रभाग क्र.१ मध्ये शिरगांव येथे शिरगांव कॉलेज ते शिरगांव तलाव पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३३,८०,२३४/-

३) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.११३, दि.२८/०४/२०१७

४)तांत्रिक मान्यता व अंदाजत्रकीय रक्कम :- मा. शहर अभियंता, पृष्ठ क्र.०८/५४, दि.१३/१२/२०१७ रु.३३,८०,२३४/-

५) जाहिर निविदा सुचना :- १) दै.वार्ताहर ५) दै.इकोनॉमिक टाईम्स
२) दै. हमारा महानगर ६) दै.फ्री प्रेस जर्नल
३) दै. मुंबई चौफेर
४) दै .नरवीर चिमाजी

६) ई -निविदा प्राप्त :-दि.२४/०६/२०१९

७) ई-निविदा उघडल्या [प्रथम लखोटा] :- दि. १५ /०७ /२०१९

[द्वितीय लखोटा] :- दि. ०९/०९/२०१९

८) प्राप्त निविदांची संख्या :- ५

९) प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा.शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र	निविदा धारकाचे - नांव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षो	निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरीटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१.	मे.बालाजी कंन्स्ट्रक्शन	१ % जास्त दराने		
२.	मे.जय भवानी इन्फ्रास्ट्रक्चर	१५.५०% जास्त दराने		
३.	मे. एम.के. डेव्हलपर्स	०.०२ % कमी दराने		
४.	मे.मेघना एंटरप्रायजेस	-५.४३% कमी दराने	DD No. १४९४३८/११/०९/२०१९	पात्र
५.	मे.संजय कंन्स्ट्रक्शन	१.१० % जास्त दराने		

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. मेघना एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकापेक्षा ५.४३%कमी दर** हा तुलनात्माकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी **मे. मेघना एंटरप्रायजेस** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा ५.४३% कमी दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्या बरोबर संविदा करण्यांस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

ठराव :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया **मे. मेघना एंटरप्रायजेस** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा ५.४३% कमी** दराची निविदा लघूत्तम असून या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देऊन त्या संबंधित पुढील कार्यवाहीस मंजुरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

P-115

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५९३ | विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : ९/३/२०२१

---

१)प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षत्रातील प्रभाग समिती 'सी' विरार (पू) प्रभाग क्र.२ मध्ये गोजावीरबाबा मंदीर ते सुशीला अपार्ट च्या मागीलबाजू पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे याकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.२१,३६,३६५/-

३) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३५०, दि.१७/९/२०१९

४)तांत्रिक मान्यता व अंदाजत्रकीय रक्कम :-मा.कार्यकारीअभियंता,पृ.क्र.२०/१४४, दि.१८/०९/२०१९
रु.२१,३६,३६५/-

५) जाहिर निविदा सुचना :-
१) दै. लोकमत
२) दै .मिड-डे
३) दै.पूर्णविराम

६) ई -निविदा प्राप्त :-दि.०३/१०/२०१९

७) ई-निविदा उघडल्या [प्रथम लखोटा] :- दि. ०४/१०/२०१९

[द्वितीय लखोटा] :- दि. २३/१२/२०१९

८) प्राप्त निविदांची संख्या :- ३

९) प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- मा.कार्यकारी अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील

P-117

अ.क्र	निविदा धारकाचे नांव	निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा	निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरीटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१.	**मे. अभय बी जाधव**	-१०.००% कमी दराने		L
२.	**मे. राथोरी भाग्यजीत ॲण्ड कं.**	५.००% जास्त दराने		L
३.	मे.श्रीयांश एंटरप्रायजेस	२१.००% जास्त दराने		L

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे. अभय बी जाधव यांच्या निविदेतील अंदाजपत्रकापेक्षा १०.००% कमी दर हा तुलनात्माकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे. तरी **मे. अभय बी जाधव यांच्या अंदाजपत्रकापेक्षा १०.००% कमी दराच्या** निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्या बरोबर संविदा करण्यांस मान्यता मिळणे कामी प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

ठराव :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया **मे.अभय बी जाधव यांच्या अंदाजपत्रकापेक्षा १०.००% कमी दराची** निविदा लघूत्तम असून या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देऊन त्या संबंधित पुढील कार्यवाहीस मंजुरी देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.- ५९४ विभाग- बजार विभाग

दिनांक - ०९/०२/२०२४

प्रस्तवाचा विषय - वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - जी वालीव अंतर्गत येणाऱ्या गोखीवरे विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसुलीचा दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ (३ वर्ष) वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास ई- निविदा प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तवाचा मजकूर - १)निविदेचा कालावधी :- दि.१/६/२०१९ ते दि.३१/५/२०२० (१ वर्ष)
२) ठेकेदाराचे नाव :- श्री. राम कैलास यादव
३) निविदेची वार्षीक रक्कम :-
रु.४३,२३,८८३/-+रु. ७,७८,२९९/-(GST)+८६,४७८/-(२%आयकर) = रु. ५१,८८,६६०/-
निविदेची मासिक रक्कम :-
रु.३,६०,३२३/- + रु. ६४,८५८/- (GST) + ७,२०६/- (२% आयकर) = रु.४,३२,३८७/-
निविदेची १० महीन्याची रक्कम :- दि. ०१/०६/२०१९ ते ३१/०३/२०२० (१० महीने)
रु.३६,०३,२३०/-+रु.६,४८,५८२/-(GST)+ ७२,०६०/-(२% आयकर) = रु.४३,२३,८७२/-

एवढी १० महीन्याची रक्कम ठेकेदार श्री. रामकैलास यादव यांनी मनपा फंडात भरणे आवश्यक होते तथापी ठेकेदार यांनी खालीलप्रमाणे रक्कम मनपा फंडात भरणा केलेली आहे.

	पा.क्र. व दिनांक
१) धनादेश क्र.०००२२८ दि.१९/९/२०२० रोजी रु १०,००,०००/-	८८२३०५/३१/१२/२०२०
२) धनादेशक्र. ०००२३० दि.२०/१०/२०२० रोजी रु.१२,४२,९१६/-	८८२३०३/३१/१२/२०२०
३) धनादेश क्र.०००२३२ दि.२३/११/२०२० रोजी रु.१०,००,०००/-	८८२३०६/३१/१२/२०२०
४)धनादेश क्र.२००१३१ दि.२४/१२/२०२० रोजी रु. २,४४,०९०/-	८८२३०८/२७/०१/२०२१

एकुण जमा रु.३४,८७,००६/- एवढी रक्कम मनपा फंडात जमा केलेली आहे. त्यामुळे रक्कम रु.४३,२३,८७२/- या रक्कमे मधुन जमा रक्कम रु.३४,८७,००६/- वजा करता रक्कम रु.८,३६,८६६/- एवढी रक्कम मनपा फंडात जमा करणे

रु. ८,३६,८६६/-

रु. २३,७८२/-

रु.११,८९,०६८/-

रु. २३,७८२/-

थकबाकी रक्कम रु. २०,७३,४९८/-

तसेच सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाची निविदा रक्कम रु.४७,५६,२७१/- एवढी असुन या पुढील कालावधीचा म्हणजेच दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीची रक्कम प्रती वर्षी १०% वाढ करुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन	कालावधी	रक्कम रुपये
२०२१-२२	दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ (१ वर्ष)	रु.५२,३१,८९९/- (+२% आयकर)
२०२२-२३	दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ (१ वर्ष)	रु.५७,५५,०८८/- (+२% आयकर)
२०२३-२४	दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ (१वर्ष)	रु.६३,३०,५९७/- (+२% आयकर)
एकुण रक्कम		रु.१,७३,१७,५८४/- (+२% आयकर)

उक्त नमुद प्रमाणे दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या ३ वर्षाच्या कालावधीची दैनिक बाजार फी एकुण रक्कम रु.१,७३,१७,५८४/- होत असुन त्या बाबतची ई - निविदा मसुदा स्वाक्षरीस्तव व ई - निविदा वृत्तपत्रात व संकेत स्थळावर प्रसीध्द करणेस व ई- निविदा प्रक्रियेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव :- प्रस्तावीत केल्याप्रमाणे गोखीवरे दैनिक बाजार फी वसुलीचा ठेका सन २०२१-२४ या वर्षातील दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२४ (३ वर्ष) पर्यंत देणेकामी ई - निविदा प्रक्रीया करणेच्या प्रस्तावास प्रशासकिय वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.- ५९५ विभाग- बजार विभाग

दिनांक - ९/३/२०२४

प्रस्तावाचा विषय - वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - जी वालीव अंतर्गत येणाऱ्या सातीवली विभागात भरणारा दैनंदिन बाजार शुल्क वसुलीचा दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ (३ वर्ष) वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास ई- निविदा प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर - १)निविदेचा कालावधी :- दि.१/४/२०१९ ते दि.३१/३/२०२० (१ वर्ष)
२) ठेकेदाराचे नाव :- श्री. अफताब शेख
३) निविदेची वार्षीक रक्कम :
रु. ४९,९९,५००/-+रु. ८,९९,९१०/-(**GST**)+९९,९९०/-(२% आयकर) = रु. ५९,९९,४००/-
एकुण रक्कम रु. ५९,९९,४००/- एवढी रक्कम ठेकेदार श्री. अफताब शेख यांनी मनपा फंडात भरणे आवश्यक होते तथापी ठेकेदार यांनी खालीलप्रमाणे रक्कम मनपा फंडात भरणा केलेली आहे.

		पा.क्र. व दिनांक
१) धनादेश क्र.१००३०३ दि.१५/०१/२०२०	रु. ३,२९,६१२ /-	८२९६७५ दि.२३/०१/२०२०
२)धनादेश क्र.१००३०४दि.१५/०२/२०२०	रु. १५,००,०००/-	८२९७७६ दि.०५/०३/२०२०
३) धनादेश क्र.०००२३१दि.०२ /११/२०२०	रु. १०,००,०००/-	८८२३०४ दि.३१/१२/२०२०
४)धनादेश क्र.२००१३२दि.०२ /०१/२०२१	रु. ५,३५,४९३/-	८८२३१२ दि.१२/०२/२०२१

एकुण जमा रु.३३,६५,१०५/- एवढी रक्कम मनपा फंडात जमा केलेली आहे. त्यामुळे रक्कम रु. ५९,९९,४००/- या रक्कमे मधुन जमा रक्कम रु.३३,६५,१०५/- वजा करता रक्कम रु.२६,३४,२९५/- एवढी रक्कम मनपा फंडात जमा करणे आवश्यक होते .तथापी सदरची रक्कम ठेकेदार यांनी आजतागायत मनपा फंडात जमा केलेली नाही . त्यामुळे ती वसुलपात्र ठरते.

माहे एप्रील २०२० ते माहे सप्टेंबर २०२० पर्यत कोरोना कालावधी असल्याने दैनिक बाजार भरत नव्हता त्यामुळे दैनिक बाजार फी वसुलीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे माहे ऑक्टोंबर २०२० ते ३१ डिसेंबर २०२० म्हणजेच दि.०१/१०/२०२० ते दि.३१/१२/२०२० या ३

अ.क्र.	बँकेचे नाव	धनादेश क्र.	दिनांक	रक्कम रु.
१.	बॅसीन कॅथलीक बँक	२००१६४	०१/०३/२०२१	रु.१०,००,०००/-
२.	बॅसीन कॅथलीक बँक	२००१६३	०९/०३/२०२१	रु. ८,९९,९१०/-
३.	बॅसीन कॅथलीक बँक	२००१६५	१०/०३/२०२१	रु.१०,००,०००/-
			एकुण	रु.२८,९९,९१०/-

त्यामुळेच श्री.अफताब शेख यांच्या समवेत दि.०१/१०/२०२० ते दि. ३१/०३/२०२१ या ६ महीन्याच्या कालावधी करिता मुदतवाढीचा करारनामा व कार्यादेश देण्यास हरकत नाही.

तसेच सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाची निविदा रक्कम रु.५४,९९,४५०/- एवढी असुन या पुढील कालावधीचा म्हणजेच दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीची रक्कम प्रती वर्षी १०% वाढ करुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन	कालावधी	रक्कम रुपये
२०२१-२२	दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ (१ वर्ष)	रु.६०,४९,३९५/- (+२% आयकर)
२०२२-२३	दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ (१ वर्ष)	रु.६६,५४,३३५/- (+२% आयकर)
२०२३-२४	दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ (१वर्ष)	रु.७३,१९,७६८/- (+२% आयकर)
एकुण रक्कम		रु.२,००,२३,४९८/-

उक्त नमुद प्रमाणे दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या ३ वर्षाच्या कालावधीचा दैनिक बाजार फी एकुण रक्कम रु.२,००,२३,४९८/- होत असुन त्या बाबतची ई - निविदा मसुदा स्वाक्षरीस्तव व ई - निविदा वृत्तपत्रात व संकेत स्थळावर प्रसीध्द करणेस व ई- निविदा प्रक्रियेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव :- प्रस्तावीत केल्याप्रमाणे सातीवली दैनिक बाजार फी वसुलीचा ठेका सन २०२१-२४ या वर्षातील दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२४ (३ वर्ष) पर्यंत देणेकामी ई - निविदा प्रक्रीया करणेच्या प्रस्तावास प्रशासकिय वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पुर्व), जि. पालघर पिन नं 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, **फॅक्स** – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग : मुख्यालय लेखा विभाग

प्रशासकीय ठराव क्र. 596 **दिनांक :** 10/03/2021

प्रस्तावाचा विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे अ व क अंदाजपत्रकाचे सन सन 2020-21 चे सुधारीत व सन 2021-22 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज मा. प्रशासक यांनी विचारात घेऊन स्विकृतीबाबत निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम 96 व 100 मधील तरतुदीप्रमाणे मा. प्रशासक यांनी सन 2020-21 च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन 2021-22 चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक अंतिमरित्या स्विकृतीसाठी पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बजेटचे अंदाज व दिव्यांग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली लेखाशिर्ष निहाय तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेऊन विचार विमर्षानंतर अंतिमरित्या स्विकृती बद्दल योग्य तो निर्णय घेण्याबद्दल निर्देश दिले आहेत.

निर्णय :- पी बजेट, जेण्डर बजेट व दिव्यांग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण अ अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी क अर्थसंकल्प, , वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी/ अमृत योजना /विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन सन 2020-21 चे सुधारीत व सन 2021-22 चे मुळ अंदाज तयार करतांना दि. 3/3/2021 ते दि. 10/3/2021 या कालावधीत सर्व विभाग व मा. लोकप्रतिनिधी यांचेशी सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन सोबत जोडलेल्या प्रपत्र एक प्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

प्रपत्र एक मधील शिफारसी स्विकृत करण्यात येत असून तदनंतर होणारा अर्थसंकल्पीय गोषवारा खालीलप्रमाणे असेल. अर्थसंकल्पीय गोषवाऱ्यात नमुद केलेले अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या स्विकृत करण्यांत येत आहेत. त्याप्रमाणे अर्थसंकल्पीय पुस्तीकेत योग्य ते बदल करुन अर्थसंकल्पीय पुस्तीका पुढील कार्यवाहीसाठी सर्व विभागांना वितरीत करण्यास व प्रसिध्द करण्यास या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

अर्थसंकल्पीय गोषवारा (रु. कोटीत)

लेखाशिर्ष	सुधारीत अर्थसंकल्प सन 2020-21	मुळ अर्थसंकल्प सन 2021-22
प्रारंभिक शिल्लक	726.09	563.02
जमा रकमा	1144.65	1437.26
प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा	1870.74	2000.28
खर्च रकमा	1307.72	1962.96
अखेर शिल्लक	536.02	37.31
अखेरच्या शिलकेसह एकूण खर्च रकमा	1870.74	2000.28

(डी.गंगाथरन, भा.प्र.से.)
मा. प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.-५९७ दिनांक . ३१/३/२०२४

बाजार

प्रस्तावाचा विषय वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - जी वालीव अंतर्गत येणाऱ्या जुचंद्र विभागात भरणारा दैनंदिन बाजार फी वसुलीचा सन २०२१-२४ वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास ई- निविदा प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील जुचंद्र विभागात भरणारा दैनंदिन बाजार फी वसूलीचा ठेका देण्यात येतो. दि. ०१/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ पर्यत या तीन महीन्या करीता वसुलीचा ठेका देण्यात आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचा वार्षिक ठेका रक्कम रुपये १९,९६,२९२. (एकोण्णीस लाख श्याण्णव हजार दोनशे ब्याण्णव) या रक्कमेवर प्रति वर्षी १०% वाढ करुन सन २०२१-२४ (३ वष) या वित्तीय वर्षा करीता दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३१/०३/२०२४ या वर्षाच्या कालावधीकरीता खालील तपशीला प्रमाणे.

सन	कालावधी	रक्कम रुपये
२०२१-२२	दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ (प्रथम वर्ष)	रु.२१,९५,९२१/- (+२% आयकर)
२०२२-२३	दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ (द्वितीय वर्ष)	रु. २४,१५,५१३/- (+२% आयकर)
२०२३-२४	दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ (तृतीय वर्ष)	रु.२६,५७,०६४/- (+२% आयकर)
एकुण रक्कम		रु.७२,६८,४९८/- (+२% आयकर)

सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाच्या ठेक्याची मुदत ३१ मार्च २०२१ रोजी संपुष्ठात येत आहे. दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या ३ वर्षाच्या जुचंद्र दैनिक बाजार फी किमान देकार रक्कम रु.७२,६८,४९८/- या रक्कमेवर ई- निविदा प्रक्रिया करणेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव :- वरील प्रस्तावाप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वालीव कार्यक्षेत्रातील जुचंद्र सन २०२१-२४ (३ वर्ष) या वर्षातील दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीसाठी आधारभुत रक्कमेवर ई-निविदा मागविण्यास व २% आयकर मंजुर निविदा दरा व्यतिरीक्त महानगरपालिकेकडे अतिरीक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. याकामी ई-निविदा मागविण्यात येणाऱ्या आनुषांगिक खर्चास प्रशासकिय वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.- ५९८ दिनांक - ३२/३/२०२४

बाजार

प्रस्तावाचा विषय वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - जी वालीव अंतर्गत येणाऱ्या कामण विभागात भरणारा दैनंदिन बाजार फी वसुलीचा सन २०२१-२४ वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास ई- निविदा प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील कामण विभागात भरणारा दैनंदिन बाजार फी वसूलीचा ठेका देण्यात येता दि.०१/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ पर्यत या तीन महीन्या करीता वसुलीचा ठेका देण्यात आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे.

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाची निविदा रक्कम रु. रु.५,९०,९६४/-एवढी असुन या पुढील कालावधीचा म्हणजेच दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीची रक्कम प्रती वर्षी १०%वाढ करुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन	कालावधी	रक्कम रुपये
२०२१-२२	दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ (प्रथम वर्ष)	रु.६,५०,०६० /- (+२% आयकर)
२०२२-२३	दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ (द्वितीय वर्ष)	रु. ७,१५,०६६/- (+२% आयकर)
२०२३-२४	दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ (तृतीय वर्ष)	रु.७,८६,५७३ /- (+२% आयकर)
एकुण रक्कम		रु.२१,५१,६९९ /- (+२% आयकर)

सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाच्या ठेक्याची मुदत ३१ मार्च २०२१ रोजी संपुष्ठात येत आहे. दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या ३ वर्षाच्या कामण दैनिक बाजार फी किमान देकार रक्कम रु.२१,५१,६९९/- या रक्कमेवर ई- निविदा प्रक्रिया करणेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव :- वरील प्रस्तावाप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वालीव कार्यक्षेत्रातील कामण सन २०२१-२४ (३ वर्ष) या वर्षातील दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीसाठी आधारभुत रक्कमेवर ई-निविदा मागविण्यास व २% आयकर मंजुर निविदा दरा व्यतिरीक्त महानगरपालिकेकडे अतिरीक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. याकामी ई-निविदा मागविण्यात येणाऱ्या आनुषांगिक खर्चास प्रशासकिय वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व,जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

बाजार

प्रशासकीय ठराव क्र.- ५९९ दिनांक - १२/०३/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - जी (वालीव) अंतर्गत येणाऱ्या वालीव विभागात भरणारा दैनंदिन बाजार फी वसुलीचा सन २०२१-२४ वित्तीय वर्षाच्या वार्षिक ठेक्यास ई- निविदा प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी मधील वालीव विभागात भरणारा दैनंदिन बाजार फी वसूलीचा ठेका देण्यात येतो. दि. ०१/०१/२०२१ ते ३१/०३/२०२१ पर्यत या तीन महीन्या करीता वसुलीचा ठेकादेण्यात आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दिनांक ३१/०३/२०२१ रोजी संपुष्टात येत आहे. तसेच सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाची निविदा रक्कम रु.५९,२३,९५३/-एवढी असुन या पुढील कालावधीचा म्हणजेच दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीची रक्कम प्रती वर्षी १०% वाढ करुन त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

सन	कालावधी	रक्कम रुपये
२०२१-२२	दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ (प्रथम वर्ष)	रु.६५,१६,३४८/- +२% आयकर)
२०२२-२३	दि.०१/०४/२०२२ ते दि.३१/०३/२०२३ (द्वितीय वर्ष)	रु. ७१,६७,९८३/- (+२% आयकर)
२०२३-२४	दि.०१/०४/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ (तृतीय वर्ष)	रु.७८,८४,७८१/- (+२% आयकर)
एकुण रक्कम		रु.२,१५,६९,११२/- (+२% आयकर)

सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षाच्या ठेक्याची मुदत ३१ मार्च २०२१ रोजी संपुष्ठात येत आहे. दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या ३ वर्षाच्या वालीव दैनिक बाजार फी किमान देकार रक्कम रु.२,१५,६९,११२/- या रक्कमेवर ई- निविदा प्रक्रिया करणेस खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

ठराव :- वरील प्रस्तावाप्रमाणे वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वालीव सन २०२१-२४ (३ वर्ष) या वर्षातील दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीसाठी आधारभुत रक्कमेवर ई-निविदा मागविण्यास व २% आयकर मंजुर निविदा दरा व्यतिरीक्त महानगरपालिकेकडे अतिरीक्त होणारी रक्कम ठेकेदाराने भरणे आवश्यक आहे. याकामी ई-निविदा मागविण्यात येणाऱ्या आनुषांगिक खर्चास प्रशासकिय वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ६००

दिनांक :- ३५/०३/२०२१

विभाग:- अग्निशमन व आणिबाणी सेवा

विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स करीता साहित्य खरेदी करणेस येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, देशात कोरोना विषाणुचा संसर्ग मोठया प्रमाणात झाला असून महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे कोरोना रुग्ण् वाढत आहेत. त्याकरीता नागरीकांमध्ये संसर्ग वाढू नये याबाबत वेळोवेळी वेगवेगळया उपाययोजना महानगरपालिकामार्फत केल्या जात आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाकरीता कार्डियाक ॲम्बुलन्स खरेदी करण्यास मा. आयुक्त सो. यांनी प्रशासकीय ठराव क्रं. २५६, दिनांक ०८/१२/२०२० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सी टाईप स्टँडर्ड वातानुकूलित २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स जी.ई.एम. (Government E-Marketplace) पोर्टल मार्फत खरेदी करणे कामी ई-निविदा प्रसिध्द केली आहे. तसेच सदर २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स वाहन प्राप्त झाल्यांनतर त्यामध्ये कार्डियाक ॲम्बुलन्स मधील आवश्यक वैद्यकिय साधने, ऑक्सिजन सिलेंडर ट्रॉली इत्यादी आवश्यक उपकरणे ठेवण्याची व्यवस्था करण्यासाठी काही फॅब्रिकेशची खालील कामे करणे आवश्यक आहे. सदरची व्यवस्था हि वाहन पुरवठादार कंपनीकडून उपलब्ध होत नसल्यामुळे ती खरेदीदाराला आवश्यकतेप्रमाणे खरेदी करावी लागते.

सदर व्यवस्था कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये करण्यासाठी व त्यांची रचना सुस्थितीत करुन परिपुर्ण ॲम्बुलन्स वाहन तयार करणेस वैद्यकिय आरोग्य विभागाने दिनांक ०९/१२/२०२० रोजीच्या पत्राने कळविले आहे. वैद्यकिय आरोग्य विभागाचे मागणी प्रमाणे २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स करीता खालील प्रमाणे साहित्याची व्यवस्था करावी लागणार आहे.

अ. क्रं.	साहित्य तपशील
1	Behind the co-driver seat one no. stainless steel water tank with motor and required pipe line connection up to the wash basin.
2	After the partition company fitted furniture's with two fixed seats and one no. single seat at left sides to be removed and above the coverings of double oxygen brackets we will provide storage unit fabricated in stainless steel 316 grade materials with telescopic drawers and one corner wash basin with S.S. tap and foot operated starter switch.
3	One no. folding seats for Doctor to be fitted to the cover of the oxygen cylinder (near the patients head / trolley at center)
4	At right side one no. storage unit fabricated in stainless steel 316 grade materials with telescopic drawers and provision to keep smaller medicine bottles.
5	For right side hump covering in stainless steel 316 grade materials.
6	Raised platform with folding flap and below the platform space to keep spine board and scoop stretcher and top fitment of your supplied along with the vehicles Auto loading trolley cum stretcher.
7	One no. S.S. medium oxygen cylinder bracket at right side corner.
8	For I. V. holder hooks and belts to be provided.
9	At rear entrance one no. PVC Arm sling and S.S. assist handle.
10	For main entrance at rear wide external foothold LED strip lights.
11	Two nos. round type yellow fog lamps in front bumper.
12	Wheel Caps.

उपरोक्त् प्रमाणे फॅब्रिकशनची कामे करण्यासाठी फॅब्रिकेटर्स कडून अंदाजीत येणा-या खर्चाची माहिती घेतली असता प्रति वाहन रक्कम रु. १,४९,८६०/- प्रमाणे दोन नग कार्डियाक वाहनांसाठी सर्व करासहित रक्कम रु. २,९९,७२०/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्च करणे करीता सन २०१९-२० सह सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान क्रं. ८७ वरील ४ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी / गणवेश खरेदी** यामध्ये ६० लक्ष तरतुद असून यामधून सदर खर्च करता येईल.

महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभागामार्फत प्रसारीत केलेल्या दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारणा नियमपुस्तिका मधील प्रकरण क्रं. ३ मधील ३.२.३ नुसार रु. ३ लक्ष खर्चापर्यंतचे खरेदी करीता दरपत्रक मागवून खरेदी करण्याची तरतूद आहे.

तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स वाहनांमध्ये आवश्यक लागणा-या सुविधा तसेच आवश्यक उपकरणे बसविणेसाठी लागणारी संरचना कंपनीकडून पुरविण्यात येणा-या कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये येत नसल्याने आवश्यक उपकरणे, साधने कमी जागेत त्याची मांडणी सुयोग्य पध्दतीने करण्यासाठी फॅब्रिकेशन करणे आवश्यक असल्याने दोन नग कार्डियाक ॲम्बुलन्ससाठी येणा-या रु. २,९९,७२०/-खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) अन्वये मा. आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार मंजुरी मिळणेस व सदर संरचना दरपत्रक मागवून खरेदी करण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेस २ नग कार्डियाक ॲम्बुलन्स वाहनांमध्ये आवश्यक लागणा-या सुविधा तसेच आवश्यक उपकरणे बसविणेसाठी लागणारी संरचना कंपनीकडून पुरविण्यात येणा-या कार्डियाक ॲम्बुलन्स मध्ये येत नसल्याने आवश्यक उपकरणे, साधने कमी जागेत त्याची मांडणी सुयोग्य पध्दतीने करण्यासाठी फॅब्रिकेशन करणे आवश्यक असल्याने दोन नग कार्डियाक ॲम्बुलन्ससाठी ३ लक्षापर्यंतचे खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता व सदर संरचना दरपत्रक मागवून खरेदी करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ६०४

विभाग :- अग्निशमन

दिनांक :-१५/०३/२०२१

विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील कर्मचा-यांकरीता सेरेमोनियल गणवेश खरेदी करणेस प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ३) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) ४) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ५) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (प.) ६) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ७) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव अशी मिळून एकुण ७ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. सदर ठिकाणी ३० अग्निशमन वाहने कार्यरत आहेत. तसेच अग्निशमन विभागाकरीता १७७ फायरमन व ४१ वाहनचालक असे एकुण २१८ कंत्राटी कर्मचारी असून ८ कायम आस्थापनेवरील कर्मचारी २४x७ सेवा बजावत आहेत.

सदर अग्निशमन कर्मचारी यांचे करीता ६० सेरेमोनियल युनिफॉर्म् यापुर्वी सन २०१९-२० मध्ये ई-निविदा मागवून खरेदी करण्यात आले असून त्यासाठी रक्क़म रुपये १,४८,१७६/- खर्च झालेला होता. उर्वरीत १६६ अग्निशमन कर्मचारी यांचे करीता सेरेमोनियल युनिफॉर्म् खरेदी करणे बाबत २६ जानेवारी २०२१ रोजी मा. आयुक्त सो. यांनी सुचना दिलेल्या आहेत. त्यानुसार प्रति सेरेमोनियल गणेवश खरेदी करीता अंदाजित रक्क़म रु. ३५००/- प्रमाणे उर्वरीत १६६ कर्मचा-यांकरीता सर्व करासाहित अंदाजित रक्क़म रु. ६,५०,७२०/- खर्च अपेक्षित आहे.

सदर गणवेश खरेदी करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिका सुधारीत अर्थसंकल्प २०१९-२०२० सह सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी / गणवेश खरेदी या लेखाशिर्षामध्ये ६० लक्ष तरतुद असून शिल्लक तरतुद रक्क़म रुपये ३७,८९,२४५/- आहे.

तरी अग्निशमन विभागातील उर्वरीत १६६ कर्मचा-यांकरीता सेरेमोनियल गणवेश ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजित रक्क़म रु. ७ लक्ष पर्यंतच्या अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मा. आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील कर्मचा-यांकरीता सेरेमोनियल गणेवश ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजित रक्क़म रु. ७ लक्ष पर्यंतचे अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 602

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : 15 /03/ **2021**

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील तुळींज हॉस्पीटल येथील 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी पाण्याची टाकी बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- देशभरात कोरोना (COVID 19) द्या विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत आहे. त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी सो. द्यांनी पालघर जिल्हयात दि. 12/03/2020 रोजी "जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कायदा" लागू केला आहे. जिल्ह्यात आरोग्य सेवा हि तातडीची बाब व देशभरात कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे झपाटयाने वाढणारी रूग्णांची संख्या लक्षात घेता मा. आयुक्त सो. द्यांनी वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत असलेले तुळींज रूग्णालयास भेट देऊन तेथील समस्यांची पाहणी केली व त्यानुसार अनेक दूरूस्तीची कामे करून घेण्याचे आदेश दिले आहे. त्यानुसार रूग्णालयाची पाहणी केली असता चौथ्या मजल्यावर शेड बांधणे व आर.सी.सी पाण्याची टाकी बांधणे आवश्यक आहे. या स्वरूपाची विविध दूरूस्तीची कामे करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजपत्रकिय रक्कम
1	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील तुळींज हॉस्पीटल येथील 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी पाण्याची टाकी बांधणे.	रू. 55,43,065/-

या करिता वर नमुद इमारतीस करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन 2019/20 द्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग , जिल्हा दरसुची नुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

ठराव - उपरोक्त वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील तुळींज हॉस्पीटल येथील 4 थ्या मजल्यावर शेड व आर.सी.सी पाण्याची टाकी बांधणे. कामी रक्कम रु. 55,43,065/-इतक्या अंदाजपत्रकिय खर्चास महाराष्ट्र अधिनियम कलम 67 (3) (क) अन्वये सदर कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेऊन पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणेत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 603 विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : 15/03/2020

मुख्य प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७६ मध्ये गोलानी येथे अगरवाल हॉस्पिटल ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर

अंदाजपत्रकीय रक्कम : -	रू. ६३,१२,१७९/- (पाईप वगळून रु. ६२,०४,३६१/-)
प्रशासकीय मंजूरी :-	मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. १३४, दि.०८/०८/२०१९
ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :-	वविशम/शअ/बांध/२९५/२०१९-२०, दि. १३/०८/२०१९
वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा	१) दै. मुंबई चौफेर, २) दै. मिड डे, ३) दै. डि एन ऐ, ४) दै. जागरूक टाईम्स, ५) दै. प्रातःकाल, ६) दै. बित्तबातमी, ७) दै. वार्ताहर दि. १४/०८/२०१९
ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी : –	वविशम/शअ/बांध/१४८/२०१९-२०, दि. ०३/०७/२०१९
वृत्तपत्रातील प्रथम वेळ फेर जाहिर निविदा : –	१) दै. जागरूक टाईम्स, २) दै. हमारा महानगर, ३) दै. नरविर चिमाजी, ४) दै. डी एन ऐ, ५) दै. सकाळ, ६) दै. लोकमत, ७) दै. मिड डे दि. ३०/११/२०१९
ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची दिनांक : –	दि. १४/०८/२०१९
ई-टेंडरींगद्वारे निविदा स्विकारण्याची दि : –	दि. ०९/०९/२०१९, ३.०१ वाजता
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेद्वारे प्राप्त निविदा : –	०३

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.01 उघडण्याची तारीख :- दि. १८/१२/२०१९

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि. १७/०१/२०२०

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- 1. कार्यकारी अभियंता
2. शहर अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
1.	मे. हमीद जे. शेख	(-) 10.99%	--	
2.	मे. अरविंद एंटरप्रायजेस	(-) 16.00 %	डी.डी.नं. 356246 दि. 03/02/2020	
3.	मे. एस. एस. एंटरप्रायझेस	(-) 13.00 %	--	

निर्णय :- सदर विषयाबाबत निविदा सभेत चर्चा करण्यात आली. सदर कामी 03 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. 03 पैकी सर्व निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त् 03 पैकी सर्व निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक मे. **अरविंद एंटरप्रायजेस यांच्या** (-) 16.00 **% कमी** दराच्या निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणे तसेच त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि-पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी क्र.-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र :- 604

विभाग :- जाहिरात विभाग
दिनांक :- 15/03/2021

.....

प्रस्तावाचा विषय :- मा.जिल्हा सत्र न्यायालय, ठाणे येथे उपस्थित राहून महानगरपालिकेची बाजू मांडणेच्या अनुषंगाने पॅनलेवरील वकील यांचे फी बाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात धोरण व अंमलबजावणी संदर्भात मा. स्थायी समिती सभा ठराव क्र.४८४ दि.१२/०१/२०१८ रोजीने मे. विजास डिजिटल इंडिया प्रा.लि.मुंबई यांचे समावेत दि.१८/४/२०१८ रोजी करारनामा करुन त्यास कार्यादेश देण्यात आलेला आहे. मे. विजास डिजिटल इ. प्रा.लि. यांनी निविदा प्रपत्रातील करारनाम्यातील अटी व शर्तीचे योग्यरीत्या पालन न केल्याने मा.आयुक्त सो, यांचे सुचनेनुसार मा. प्रशासकीय ठराव क्र.२२८ दि.१८/११/२०२० अन्वये उक्त निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला.

त्यानुसार मे विजास डिजिटल इ. प्रा.लि. मुंबई यांना करारनामा रद्द करणेबाबत व प्रदेय भरणा करणेबाबत नोटीस बजावण्यात आलेली आहे. या विरोधात मे. विजास डिजिटल इ.प्रा.लि. मुंबई यांनी मा.जिल्हा न्यायालय, ठाणे येथे महानगरपालिकेच्या विरोधात दावा दाखल केला असून त्यांचा दावा क्र.सी.एम.ए १५१/२०२० दि.१४/१२/२०२० रोजी दाखल करण्यात आलेला आहे.

त्याअनुषंगाने मा.जिल्हा सत्र न्यायालय ठाणे, यांचेमार्फत महानगरपालिकेस दि.७/१२/२०२० रोजी कारणे दाखला नोटीस बजावण्यात आलेली असून दि.१४/१२/२०२० रोजी मा.न्यायालयात सुनावणीस उपस्थित राहणेकामी कळविले होते. याबाबत महानगरपालिकेच्या विधी पॅनलवरील वकील ॲड. स्वप्नील भदाणे यांचे समावेत चर्चा केली असता त्यांनी दि.०९/१२/२०२० रोजी उक्त दाव्यासंदर्भात त्यांचे फी दराबाबतचे पत्र सादर केलेले आहे.

उक्त प्रकरणी मा.जिल्हा न्यायालय ठाणे, येथे नजिकच्या तारखेस म्हणजेच दि.१४/१२/२०२० रोजी सुनावणी असले कारनाने तातडीने ॲड. स्वप्नील भदाणे यांस वकिल पत्र देऊन दि.९/१२/२०२० रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा. न्यायालयात वसई विरार शहर महानगरपालिकेची बाजू मांडण्यासाठी पॅनेलवरील नियुक्त वकिल यांनी न्यायालयात दाखल झालेल्या व पुढील काळात दाखल होणा-या दाव्यांच्या कामासाठी महानगरपालिकेच्या वतीने वेळोवेळी बाजू मांडण्याकरीता व दावे दाखल करण्यासाटी कॅव्हेट फाईल तयार करणे, नोटीसा देणे, कायदेशीर सल्ला देणे, व इतर अनुषंगाने कामे पाहणेकामी कनिष्ठ न्यायालयात वकील नेमणुकीचे व काढून टाकण्याचे अधिकार तसेच वेळोवेळी येणा-या खर्चास मा.आयुक्त तथा प्रशासक यांना अधिकार असून फी धोरणाबाबत मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४ दि.१३/१०/२०१७ व मा. प्रशासकीय ठराव क्र.१०२ दि.१५/०९/२०२० अन्वये फी धोरणास मंजुरी आहे.

604

परंतु उक्त ठरावाचे अवलोकन केले असता मा.जिल्हा न्यायालय, ठाणे करीताचे फी धोरणाचा उल्लेख त्यामध्ये आढळून येत नाही. त्यामुळे मा.जिल्हा न्यायालय, ठाणे करीता पॅनलवरील वकीलांचे फी धोरणास मान्यता घेणे आवश्यक आहे.

मा.जिल्हा न्यायालय ठाणे येथे महानगरपालिकेच्या वतीने संदर्भिय दाव्याचे कामकाज केलेबाबत पॅनलवरील वकिल ॲड. स्वप्नील भदाणे यांनी देयक क्र.४६/२०२० दि.३/१२/२०२० रोजीने रक्कम रु.५०,०००/- चे देयक सादर केलेले आहेत. तरी सादर केलेले देयक दावे व खटले फी या लेखाशिर्षकाअंतर्गत वरील नमूद केलेल्या रक्कमेला खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात मंजुरीस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका जाहिरात विभागातील न्यायालयीन कामकाज करणेकरीता पॅनलवर नेमणुक केलेल्या ॲड स्वप्नील भदाणे यांना दाव्यांचे काम पाहणेकरीता रक्कम रु.५०,०००/-(पन्नास हजार मात्र) रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रदिप शिंदे पाटील
उपआयुक्त (जा)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्यकार्यालय विरार

प्रशासकीय ठराव क्र. :- 605

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

दिनांक :- 15/03/2021

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेतेसाठी व त्याबाबतअसलेल्या तक्रारीसाठी 24x7 हेल्प लाईन नंबर 14420 BSNL द्वारा घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज मध्ये भाग घेत आहे. सदर चॅलेंज संदर्भात मा. गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री श्री. हरदीप पुरी यांच्या उपस्थितीत साधन पुस्तिका प्रसिध्द करण्यात आले होते. या पुस्तिकेमध्ये MoHUA मार्फत सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षतेसाठी व त्याबाबत असलेल्या तक्रारीसाठी 24x7 हेल्प लाईन नंबर 14420 सुरु करण्यात आला आहे. त्यानुसार महानगरपालिकेने खालिल प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

1. आपल्या मनपाने तात्काळ बीएसएनएलकडे अर्ज करावा आणि जास्तीत जास्त एका आठवड्यात हेल्पलाईन नंबर(जीपीएसच्या आधारावर) कॉल सेंटरची व्यवस्था करावी.

2.शहरात स्वतःचा स्थानिक हेल्पलाईन नंबर उपलब्ध असल्यास सदर **helpline** नंबर आवश्यक असल्यास 14420 या राष्ट्रीय क्रमांकसह संलग्न करावा.

3.नागरिकांमध्ये हेल्पलाईन क्रमांक 14420 ची व्यापक प्रसिध्दी द्यावी.

वसई विरार शहर महानगरपालिकेत उपलब्ध असलेल्या टोल फ्रि क्रमांक 1800 233 4353 बीएसएनएल द्वारे समाविष्ठ करण्यात आला असुन सर्वच तक्रारी करीता वापर होत आहे त्यामुळे सतत व्यस्त आढळून येत असल्याने वरिल क्रमांक सफाई मित्र सुरक्षा करिता योग्य नाही. म्हणून बीएसएनएल टोल फ्रि क्रमांक 14420 मध्ये प्रस्थापित करण्यात यावा. तसेच वरिल टोल फ्रि क्रमांकाचे दर पुढील तक्त्यात नमुद केले आहे.

TARIFF FOR TOLLFREE NUMBER

1.	**Processing charge for service (Non refundable)**	**Rs.3000/-**
2.	**Security deposit (Refundable) (To be reviewed every 6 months)**	**Initially Rs.10,000/- & to be updated to 2 months average billing**
3.	**Fixed Monthly Charges forservice**	**Rs.1000/- per month**
4.	**Call Charges** **Local (Within same SDCA)** **Intra Circle (Within same circle)** **Inter Circle(Outside the circle)** **Within Circle** **Outside Circle** **National Roaming**	**From Basic/WLL** **Rs.1.20/120 sec** **Rs.1.20/60 sec** **Rs.1.60/60 sec From Cellular** **Rs.1.20/60sec** **Rs.1.60/60sec** **Rs.1.60/60sec**
5.	**Discount To Free Phonesubscriber (Note: The discount is on non-graded basis)**	**Monthly Bill** — **Discount** **Upto Rs. 10000/-** — **Nil** **Rs. 10001 to 50000/-** — **10 %** **Rs. 50001 to 250000/-** — **15 %** **Rs. 250001 to 500000/-** — **20 %** **> Rs. 500000/-** — **25 %**

6.	Charges for any modification in service on request from subscriber	Rs.100/- per modification	
7.	Detail billing soft copy (On demand by Sub.) (Per month)	Rs.100/-	
8.	Vanity Numbers Charges(optional)	One Time	Monthly Payment
	Super Premium (Category A)	Rs.1000/-	Rs.1000/-
	Premium (Category B)	Rs.7500/-	Rs.750/-
	Prime (Category C)	Rs.5000/-	Rs.500/-

उपरोक्त प्रमाणे तक्त्यातील अ.क्र. 1 मधील Processing charge Rs.3000/-, अ.क्र. 2 Security deposit (Refundable) (To be reviewed every 6 months) Rs.10,000/-, अ.क्र. 3 Fixed Monthly Charges for service Rs.1000/- per month, अ.क्र. 6 Charges for any modification in service on request from subscriber Rs. 100/- Per modification अ. क्र. 7 Charges for any modification in service on request from subscriber Rs.100/- तसेच दर महा येणारे बिल व अ.क्र. 1 नुसार हेल्पलाईन नंबर(जीपीएसच्या आधारावर) कॉल सेंटर साठी लागणारे Gem Portal वरिल प्राप्त दर पत्रका द्वारे Head Phones (JBL Wired Headset/Sennheshiser Wired Handset) रु. 5000/-असा एकूण अंदाजित रक्कम रु. 19,200/- इतका आहे.

सदर योजना राबविण्याकरीता एकुण अंदाजित खर्च रक्कम रु. १९,२००/- असुन तसेच दर महा येणारे बील असा सदरचा खर्च लेखासांकेतांक क्र.३४०-२५५०-१, घनकचरा व्यवसथापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. सफाईसाठी घंटा गाडी, यांत्रिक झाडु उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नाले सफाई या लेखासांकेतांकामधुन भागवता येईल. तरी सदर कामी होणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेस आपल्या आदेशास्तव सादर,

ठराव निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत सफाई मित्र सुरक्षा चॅलेंन्ज अंतर्गत सफाई कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेतेसाठी, मल:निस्सारण वाहिणी तसेच मैला टाकी सफाई संबधित तक्रारी निराकरण करण्याकरिता स्वतंत्र बीएसएनएल टोल फ्रि क्रमांक उपलब्ध करुन 14420 या राष्ट्रीय क्रमांकसह संलग्न करण्याकरिता एकुण अंदाजित खर्च रक्कम रु. १९,२००/- तसेच दर महा येणारे बिल या खर्चास प्रशासकिय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक/आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 606

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : 15/03/ **2021**

मुख्य प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) प्रभाग क्र. 53 मधील टेलिफोन एक्सचेंज ते गांवदेवी मंदीरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर

अंदाजपत्रकीय रक्कम : - रू. 29,01,049/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. 119 दि. 28/04/2017

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- वविशम/श.अ./बांध/727/2019 दि.15/11/2019 शहर अभियंता, वसई- विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील ई- निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि. 13/12/2019

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. सकाळ, दै. मिड डे व दै. नरवीर चिमाजी

ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची तारीख :- दि. 23/12/2019 ते दि. 26/12/2019 दु. 3.01 वाजेपर्यंत

विहित मुदतीत ऑनलाईन प्राप्त निविदा :- 03

ई-टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) दि. 26/12/2019

ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि. 22/01/2020

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :-
1. कार्यकारी अभियंता
2. शहर अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
1.	मे. जिवदानी एंटरप्रायजेस	(+) 5.00 %	--	
2.	मे. माता जिवदानी कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकीय दराने	--	
3.	मे. साई पोमू कंन्स्ट्रक्शन	(+) 7.00 %		

उपरोक्त तक्त्याचे अवलोकन करता मे. माता जिवदानी कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दराची निविदा प्राप्त निविदाधारकांमधील लघुत्तम दराची आहे.

परंतू मे. माता जिवदानी कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दर कमी करणेचे मा. आयुक्त सो. यांचे निर्णयानुसार मे. माता जिवदानी कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) नुसार कामाची निविदा संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- उपरोक्त कामी मे. माता जिवदानी कंन्स्ट्रक्शन यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% कमी दरास निविदा समितीने मान्यता दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73(क) अन्वये मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी महानगरपिलकेतर्फे कायदेशीर बाबींची पूर्तता करून संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६०७ | विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : ३५/०३/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर अस्थिरोग तज्ञ व फिजिओथेरपीस्ट डॉक्टर नियुक्त करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वसई (प.) येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयामध्ये ७० बेड्स व नालासोपारा (पू.) येथील विजयनगर-तुळींज या रुग्णालयात ८० बेड्स आहेत. तसेच महानगरपालिकेने चंदनसार, विरार (पू.) येथे नव्याने आय.सी.यू सुविधा असलेले श्री जीवदानी देवी रुग्णालय दि.२१/०८/२०२० पासून सुरु केले आहे. याव्यतिरिक्त महानगरपालिकेची सर्वोदय वसाहत, सातिवली व जुचंद्र येथे माताबाल संगोपन केंद्र कार्यरत आहेत. महानगरपालिकेच्या या रुग्णालयामध्ये आंतररुग्ण, प्रसुतीसाठी महिला रुग्ण व बालके इत्यादी वैद्यकीय सेवेसाठी दाखल होत असतात. तसेच रुग्णालयात मोठया प्रमाणावर नागरिक बाहय रुग्ण म्हणून वैद्यकीय सेवेचा लाभ घेतात. यासाठी यापूर्वी रुग्णालयात विविध प्रकारच्या वैद्यकीय सेवा विविध डॉक्टरांकडून उपलब्धतेबाबत मानद तत्वावर नियुक्त करणेबाबतचे विनंती अर्ज प्राप्त झाले नुसार डॉक्टरांच्या मानद तत्वावर नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत. यानुसार महानगरपालिकेची मा. सर्वसाधारण सभा दि.११/०२/२०१४ ठराव क्र.१८, मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६, मा. महासभा दि.१६/०४/२०१५ ठराव क्र.२९ व मा. महासभा दि.१८/११/२०१६ ठराव क्र.१३ अन्वये नि श्चत केलेल्या आंतर रुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी निश्चित केल्याप्रमाणे सद्यस्थितीत मानद तत्वावर काम करीत असलेल्या विविध विषयाच्या डॉक्टर्सना त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे फी अदा केली जाते. तसेच मा. स्थायी समिती सभा दि.०५/०३/२०१९ ठराव क्र.६२६ अन्वये महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे येथे मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या तज्ञ डॉक्टरांचे मासिक मानधन रु.४,५००/- इतके मानधन वाढ करण्यांत आलेले आहे. महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे विविध प्रशासकीय ठरावानुसार रुग्णांकडून आकारण्यांत येणारी फी रद्द करुन मा. सर्वसाधारण सभा दि.१७/०१/२०१९ ठराव क्र.२२ अन्वये संपूर्ण वैद्यकीय सेवा विनामूल्य देणेकामी प्रशासकीय मंजूरी देण्यांत आलेली असुन सदरची वैद्यकीय सेवा ही दि.०८/०३/२०१९ पासून महानगरपालिकेची रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे विनामूल्य देण्यांत येत आहे.

महानगरपालिकेच्या वसई येथील सर डी. एम. पेटीट रुग्णालयात पूर्ण वेळ तसेच मानद तत्वावर एकही अस्थीरोग तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची मोठया प्रमाणात गैरसोय निर्माण होत असल्याने प्र.वैद्यकीय अधीक्षक, सर. डी. एम. पेटीट रुग्णालय यांनी डॉ. मॅथ्यू चेरीपुरम, एम.बी.बी.एस., डिप्लो.(ऑर्थो) सी.पी.एस व डॉ. अल्हाद राऊत, एम.बी.बी.एस., डी.एन.बी. (ऑर्थो) यांचे विनंती अर्जानुसार मानद तत्वावर अस्थिरोग तज्ञ डॉक्टर म्हणून रुग्णालयात नियुक्त करणेबाबत दि.१०/०२/२०२० रोजी अहवाल सादर केलेला आहे. तद्नंतर प्र.वैद्यकीय अधिक्षक यांचेकडील पत्र क्र.वविशम/दवा/१११/२०२०-२१ दि.०१/१०/२०२० नुसार एक अस्थिरोग तज्ञ डॉक्टरांची आवश्यकता असल्याचे कळविण्यात आले होते. महानगरपालिकेच्या नव्याने सुरु केलेल्या पॉली क्लिनिक साठी अस्थिरोग तज्ञ डॉक्टरांची सेवा आवश्यकता असल्याने मा.प्रशासकीय ठराव क्र.३६४

दि.१४/०१/२०२० चे मंजूरीनुसार वरील २ अस्थिरोग तज्ञ डॉक्टरांपैकी डॉ. मॅथ्यू चेरीपुरम यांची जावक क्र.वविशम/वैआवि/१८७३/२०२१ दि.१४/०१/२०२१ रोजीच्या आदेशान्वये पॉली क्लिनिक येथे मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणेकामी नियुक्ती करण्यांत आलेली आहे. तसेच रुग्णालयात फिजिओथेरपी ची वैद्यकीय सेवा रुग्णांना पुरविणेकामी एकही फिजिओथेरपीस्ट डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याने डॉ. नौशीन मेमन, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी असून त्यांची रुग्णालयात मानद तत्वावर फिजिओथेरपीस्ट डॉक्टर म्हणून नियुक्त करणेबाबत प्र.वैद्यकीय अधिक्षक, सर डी. एम. पेटीट रुग्णालय यांनी जा.क्र.वविशम/दवा/२१९/२०२०-२१ दि.०७/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात फिजिओथेरपीस्ट डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याने सदर ठिकाणी मानद तत्वावर फिजिओथेरपीस्ट डॉक्टरांची नियुक्ती केल्यास वैद्यकीय (ओ.पी.डी) सेवा पुरविण्यात येऊन नागरिकांना या सेवा सुविधांचा लाभ घेता येईल. महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालयात डॉ. सुरज बघेल व डॉ. भुषण पाटील यांची महानगरपालिकेने मानधन तत्वावर अस्थिरोग तज्ञ म्हणून ६ महिन्यासाठी अस्थायी पदावर नियुक्ती केलेनुसार महानगरपालिकेच्या रुग्णालयात काम करीत आहेत तसेच डॉ. सुनिलकुमार पटेल हे मानद तत्वावर वैद्यकीय सेवा देत आहेत. सबब महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणेकामी अस्थिरोग तज्ञ व फिजिओथेरपीस्ट डॉक्टरांचे विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	डॉक्टरांचे नाव	शैक्षणिक पात्रता	अर्जाचा दिनांक	पुरविण्यांत येणारी वैद्यकीय सेवा	रुग्णालय
१.	डॉ. अल्हाद राऊत	एम.बी.बी.एस., डी.एन.बी. (ऑर्थो)	दि.११/११/२०१९	अस्थिरोग तज्ञ	सर डी. एम. पेटीट रुग्णालय
२.	डॉ. नौशीन मेमन	बॅचलर ऑफ फिजिओथेरपी	दि.०७/०१/२०२१	फिजिओथेरपीस्ट	सर डी. एम. पेटीट रुग्णालय
३.	डॉ. किरण आडे	बॅचलर ऑफ फिजिओथेरपी	दि.१८/१२/२०२०	फिजिओथेरपीस्ट	तुळींज रुग्णालय

सबब वरील अस्थिरोग तज्ञ व फिजिओथेरपीस्ट डॉक्टर यांनी महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी मानद तत्वावर नियुक्त करणेस विनंती केलेली आहे. शहरातील नागरीकांना जास्तीत जास्त वैद्यकीय सेवा पुरविण्याच्या दृष्टीने विविध विषयांचे तज्ञ डॉक्टर्स रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रामध्ये उपलब्ध करुन घेणे आवश्यक असुन याचा फायदा मोठया प्रमाणावरील रुग्णांना होणार आहे. यानुसार त्यांची महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मानद तत्वावर नियुक्त करणेकामी त्यांचे अर्जावर विचार करणे योग्य होईल. तसेच याकामी नियुक्त करण्यांत येणाऱ्या उपरोक्त ३ डॉक्टरांना मासिक मानधन म्हणून मा. स्थायी समिती सभा दि.०५/०३/२०१९ ठराव क्र.६२६ अन्वये निश्चित केलेनुसार दरमहा रु.४,५००/- इतके मानधन व त्यांनी केलेल्या कामाची होणारी आंतर रुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी याकरीता अंदाजे वार्षिक रु.५,६२,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात केलेल्या तरतूदीमधून सदरकामी येणारा खर्च भागविता येईल याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे-

अ.क्र.	सन २०२०-२१ लेखाखिर्ष व तरतूद	तपशिल	खर्च
१.	"ऑपरेशन चार्जेस, लॅब चार्जेस, सोनोग्राफी व एक्स-रे चार्जेस" (रु.१,००,००,०००/-)	अ.क्र.१ मधील नमूद अस्थिरोग तज्ञ डॉक्टरांना आंतर रुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी	अंदाजे वार्षिक खर्च रु.४,००,०००/-
		अ.क्र.१ ते ३ मधील नमूद डॉक्टरांना मासिक मानधन रु.४,५००/- प्रमाणे	वार्षिक रु.१,६२,०००/-
		एकूण	रु.५,६२,०००/-

तरी यानुसार डॉ. अल्हाद राऊत, एम.बी.बी.एस., डी.एन.बी. (ऑर्थो), डॉ. नौशीन मेमन, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी व डॉ. किरण आडे, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी यांचे अर्जावर विचार होऊन त्यांना मानद तत्वावर डॉक्टर म्हणून मा. सर्वसाधारण सभा दि.११/०२/२०१४ ठराव क्र.१८, मा. सर्वसाधारण सभा दि.१६/०२/२०१५ ठराव क्र.२६, मा. महासभा दि.१६/०४/२०१५ ठराव क्र.२९ व मा. महासभा दि.१८/११/२०१६ ठराव क्र.१३ अन्वये निश्चत केलेल्या आंतर रुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी व मा. स्थायी समिती सभा दि.०५/०३/२०१९ ठराव क्र.६२६ अन्वये निश्चित केलेनुसार दरमहा रु.४,५००/- च्या मानधन तत्वावर नियुक्त करणेकामी निर्णय होणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (३) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार डॉ. अल्हाद राऊत, एम.बी.बी.एस., डी.एन.बी. (ऑर्थो), डॉ. नौशीन मेमन, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी व डॉ. किरण आडे, बॅचलर ऑफ फिजिओथेरपी यांना महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये मानद तत्वावर वैद्यकीय सेवा पुरविणेसाठी नियुक्ती आदेश देणेकामी तसेच याकामी मानद तत्वावर तज्ञ डॉक्टर्स म्हणून दरमहा रु.४,५००/- च्या मानधन तत्वावर व त्यांनी केलेल्या कामाची होणारी आंतर रुग्ण तपासणी फी, शस्त्रक्रिया फी अदा करणेकामी येणाऱ्या वार्षिक रु.५,६२,०००/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६०८ — विभाग : बांधकाम

दिनांक : ३५/०३/२०२१

विषय : वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील फिलीप कॉम्प्लेक्सच्या पाठीमागील २० मी. डी.पी. रस्त्यावर आर.सी.सी कल्व्हर्ट बांधणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ३५,९९,६२७/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. आयुक्त तथा प्रशासक, ठराव क्र. ३२७ दि. ०४/०१/२०२१
तांत्रिक मंजुरी	:-	दि. ०४/०१/२०२१
ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	दि. १२/०१/२०२१
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि.	:-	दि. १३/०१/२०२१
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. मुंबई चौफेर २) दै. पुढारी ३) दै. पुण्यनगरी
प्रिपरेशनची तारीख	:-	दि. १३/०१/२०२१ ते दि. २७/०१/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०१
ई-टेण्डरींगद्वारे जाहीर फेर ई निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	दि. ०२/०२/२०२१
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि.	:-	दि. ०३/०२/२०२१
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. चिमाजी २) दै. पुढारी ३) दै.
प्रिपरेशनची तारीख	:-	दि. ०३/०२/२०२१ ते दि. ०९/०२/२०२१
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०३
ई-टेण्डरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. १०/०२/२०२१
ई-टेण्डरींग द्वारे निविदा द्वितीय लखोटा उघडण्याची दिनांक	:-	दि. १८/०२/२०२१
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१	मे. इरा एंटरप्रायजेस	१३.७०% कमी दराने	एफ.डी.आर क्र. ८३८४०५ दि. ०४/०३/२०२१
२	मे. हमीद जे. शेख	१२.७९% कमी दराने	-
३	मे.एस एस एंटरप्रायजेस	१०.००% कमी दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता मे. इरा एंटरप्रायजेस यांची १३.७०% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता मे. इरा एंटरप्रायजेस यांच्या निविदेतील १३.७०% कमी दराची निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत.

दि.०५/०३/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने मे. इरा एंटरप्रायजेस यांच्या १३.७०% कमी दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी मे. इरा एंटरप्रायजेस यांच्या १३.७०% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील फिलीप कॉम्प्लेक्सच्या पाठीमागील २० मी. डी.पी. रस्त्यावर आर.सी.सी कल्व्हर्ट बांधणे कामी मे. इरा एंटरप्रायजेस हयांची १३.७०% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) अन्वये या १३.७०% कमी दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

२१५ प.

प्रशासकीय ठराव क्र. ६०९ विभाग : बांधकाम
दिनांक : ३५/०३/२०२१

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी स्मशानभुमीचे नुतनीकरण करणे. याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ४९,०७,२०७/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. स्थायी समिती ठराव/विषय क्र. ५४ दि. २७/०८/२०१९
तांत्रिक मंजुरी	:-	मा. शहर अभियंता ०८/७० दि. ११/०९/२०१९
ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	वविशम/बांध/५७४/२०१९ दि. १७/०९/२०१९
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि.	:-	दि. २९/०९/२०१९
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. मिड डे २) दै. मुंबई चौफेर ३) दै. पुर्णविराम
ई -टेण्डरींग निविदा प्रिपरेशनची तारीख	:-	दि.०२/०१/२०२० दु. ३.०० पासुन ते दि.१३/०१/२०२० दु. ३.०१ पर्यंत
ई -टेण्डरींग निविदा सुचना स्विकारण्याची तारीख	:-	दि. १३/०१/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०३
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	शहर अभियंता
ई -टेण्डरींग फेर निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	वविशम/बांध/६११/२०२० दि. ०३/१२/२०२०
वृत्तपत्रातील फेर निविदा प्रसिध्दी दि.	:-	दि. ०४/१२/२०२०
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. पुढारी २) दै. जागल्या ३) दै. द इकोनॉमिक टाईम्स
ई -टेण्डरींग फेर निविदा प्रिपरेशनची तारीख	:-	दि.०४/१२/२०२० दु. ३.०० पासुन ते दि.१०/१२/२०२० दु. ३.०१ पर्यंत
ई -टेण्डरींग फेर निविदा सुचना स्विकारण्याची तारीख	:-	दि. १०/१२/२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०४
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१	मे. एस. एस. एंटरप्रायजेस	११.२१% कमी दराने	-
२	मे. बरकत कॉंट्रक्टर्स	१८.००% कमी दराने	धनाकर्ष क्र. ३३८४७३ दि. १२/०१/२०२१ पावती क्र. ८६१५६० दि. १२/०१/२०२१
३	मे. सहारा एंटरप्रायझेस	१५.००% कमी दराने	-
४	मे. महेश विजय सातपुते	१०.००% कमी दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. बरकत कॉंट्रक्टर्स** यांची १८.००% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. बरकत कॉंट्रक्टर्स** यांच्या निविदेतील १८.००% कमी दराची निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहेत.

दि. ०२/०३/२०२१ रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. बरकत कॉंट्रक्टर्स** यांच्या १८.००% कमी दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी **मे. बरकत कॉंट्रक्टर्स** यांच्या १८.००% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०९ मधील पापडी स्मशानभुमीचे नुतनीकरण करणे. कामी **मे. बरकत कॉंट्रक्टर्स** हयांची **१८.००% कमी** दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) अन्वये या **१८.००% कमी** दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५

दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४० विभाग : बांधकाम

दिनांक : ३५/०३/२०२४

विषय : प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील ६० रस्त्यालगत नाना-नानी पार्कमध्ये विविध विकास कामे करणे याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. १०,३५,५७९/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११ दि. २०/०५/२०१७
तांत्रिक मंजुरी	:-	दि. ०१/०९/२०१४
ई -टेण्डरींग निविदा सुचना प्रसिध्दी तारीख	:-	वविशम/काअ/बांध/९६७/२०१७ दि. १७/०६/२०१७
वृत्तपत्रातील निविदा प्रसिध्दी दि.	:-	वविशम/काअ/बांध/९६७/२०१७ दि. १९/०६/२०१७
वृत्तपत्राचे नांव	:-	१) दै. सकाळ २) दै. नरवीर चिमाजी
प्रिपरेशनची तारीख	:-	दि.०५/०७/२०१७ ते दि.०७/०७/२०१७
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रिक्रियेद्वारे प्राप्त निविदा	:-	०६
ई-टेण्डरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. १०/०७/२०१७
ई-टेण्डरींग द्वारे निविदा द्वितीय लखोटा उघडण्याची दिनांक	:-	दि. ०२/०२/२०१९
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	कार्यकारी अभियंता

<u>प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :-</u>

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१	मे. साई गणेश एंटरप्रायजेस	७.८६% कमी दराने	-
२	मे. साई कंस्ट्रक्शन	८.००% जास्त दराने	-
३	मे. इरा एंटरप्रायजेस	४.९०% जास्त दराने	-
४	मे. सी. एस. मोहिते	५.००% जास्त दराने	-

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांची **७.८६%** कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदर निविदांची तुलना केली असता **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील **७.८६%** कमी दराची निविदा ही तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहेत. तथापिक **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांची निविदा दराचा लखोटा दि. १०/१२/२०१९ रोजी उघडल्यानंतर आठ दिवसांच्या आत परफॉर्मन्स डी.डी. देणे अपेक्षित होते. परंतु **मे. साई गणेश एंटरप्रायजेस** यांनी सदरचा परफॉर्मन्स डी.डी. विहीत मुदतीत सादर न केल्याने या कामाकरीता भरण्यात आलेल्या द्वितीय लघुत्तम निविदा धारकास जा.क्र. १७७७ दि. १३/०१/२०२० अन्वये मा. अध्यक्ष, निविदा समिती यांच्याकडे दि. १४/०१/२०२० रोजी बोलवण्यांत आलेले आहेत. या अनुषंगाने द्वितीय लघुत्तम निविदा धारक **मे. इरा एंटरप्रायजेस** यांनी सदरचे काम **८.८०% कमी** दराने करण्यास लेखी संमती दिलेली आहे. तसेच **मे. इरा एंटरप्रायजेस** यांचेकडुन **८.८०% कमी** दराच्या अनुषंगाने पावती क्र. ८५०३३६ दि. २७/०१/२०२० रोजी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेत आलेली आहे.

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल
१	मे. इरा एंटरप्रायजेस	दि. १४/०१/२०२० रोजी मा. निविदा समितीसमोर वाटाघाटी नंतरचे ८.८०% कमी दर	धनाकर्ष क्र. ०१३२६८ दि. ०२/०२/२०२० पावती क्र. ८५०३३६ दे. २७/०१/२०२०

दि.१४/०१/२०२० रोजी अन्वये मा. निविदा समितीने **मे. इरा एंटरप्रायजेस** यांच्या **८.८०% कमी** दराच्या निविदेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

तरी **मे. इरा एंटरप्रायजेस** यांच्या **८.८०% कमी** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३(क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'आय' कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील ६० रस्त्यालगत नाना-नानी पार्कमध्ये विविध विकास कामे करणे कामी **मे. इरा एंटरप्रायजेस** हयांची **८.८०% कमी** दराची मा. निविदा समितीने मंजुर केलेली निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ७३(क) अन्वये या **८.८०% कमी** दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजुर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र.६९९ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-१५/०३/2021

प्रस्तावाचा विषय :- गोखिवरे / भोयदापाडा घनकचरा व्यवस्थापन केंद्रात 200 के.व्हि.ए रोहित्र बसविणे करीता रोहित्र व विद्युत भार चार्ज (Load Charge) भरणेकामी प्रशासकिय वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्यां मांलकीच्या गोखीवरे / भोयदापाडा येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्रात 18 अश्वशक्तीच्या 10 मशीन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बसविणेची कार्यवाही आरोग्य विभागामार्फत सुरु आहेत.परंतु, सदर ठिकाणी वाढीव विज भाराची गरज असल्याने मा.आयुक्त सो. यांचे आढावा बैठकीत आवश्यक विज भार वीजवितरण कंपनीकडुन करुन घेण्याचे आदेश विद्युत विभागास दिलेले आहेत. त्याअनुषंगाने, वीजवितरण कंपनीकडे पाठपुरावा करुन दि.03/03/2021 रोहित्र व विद्युत भार मंजुर करण्यात आलेला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेस महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीने 100% अंदाजपत्रकिय रक्कम भरण्याचे मागणीपत्रक दि.05/03/2021 रोजी दिले असुन, रक्कम 9,81,515/- रुपये म.रा.वि.वि. कंपनीकडे भरणा करणे आवश्यक आहे.

सदर कामाचा खर्च हा "दिबाबत्ती विभाग पोल स्थलांतर व सर्किट लाईट व्यवस्था " या लेखाशिर्षाखाली भागविण्यात येईल.

1) मुळ तरतुद :- 4,00,00,000/-
2) या पुर्वीचा खर्च :- 33,49,000/-
3) प्रस्तावित खर्च :- 9,81,515/-
4) उपलब्ध खर्च :- 3,56,69,485/-

नियंत्रण नोंदवही पृ.क्र. अ.क्र. वर नोंद घेतली आहे.

सबब महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस रोहित्र व विद्युत भार चार्ज (Additional 112 K.W) भरणा करणेंस प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- गोखिवरे / भोयदापाडा घनकचरा व्यवस्थापन केंद्रात 200 के.व्हि.ए रोहित्र बसविणे करीता रोहित्र व विद्युत भार चार्जेस (Load Charge) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस भरणा करणेकामी रक्कम 9,81,515/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेंत येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५

दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७

प्रशासकीय ठराव क्र.-६३२ विभाग - आस्थापना (मु)

दिनांक १५/०३/२०२१

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिकेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले श्री. सुरेंद्र ठाकरे, शाखा अभियंता यांना महानगरपालिका सेवेत कायम स्वरुपी सामावून घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नवि मुंबई यांनी संदर्भाधिन आदेश दि. २६/११/२०१५ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये श्री. सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य) यांची प्रतिनियुक्तीवर पदस्थापना देण्यात आली होती.

मा. महासभा ठराव क्र. १२, दि.१३/१२/२०१९ अन्वये श्री.ठाकरे यांना वसई विरार शहर महानगरपालिकेत शाखा अभियंता या समकक्ष पदावर खालील अटी व शर्तीनुसार सामावून घेण्यास मान्यता देण्यात आलेली होती.

अटी व शर्ती

१. श्री. सुरेंद्र ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य) यांना वसई विरार शहर महानगरपालिकेत शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर सामावून घेतलेल्या दिनांकापासून ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झाले असे समजण्यांत येईल.

२. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील दिनांक २८/०४/१९८१ च्या शासन निर्णयानुसार श्री. सुरेंद्र ठाकरे यांच्या महानगरपालिकेत कायम समावेशाच्यानंतरची दिनांक व प्राधिकरणाकडील त्यांच्या खात्यात जमा असलेली अर्जीत रजा कायम समावेशानंतर वसई विरार शहर महानगरपालिकेतील त्यांच्या खात्यात जमा करण्यांत येईल, व त्याच्या मोबदल्यात त्यांच्या कायम समावेशनाच्या दिनांकाला प्राधिकरणाकडील त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेच्या रजा वेतनाऐवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वसई विरार शहर महानगरपालिकेला अदा करील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम ६७ व नियम क्र. ११० नुसार असलेल्या निवृत्तीविषयक लाभास ते पात्र ठरतील.

४. श्री. सुरेंद्र ठाकरे यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील सेवा, त्यांचे सद्याचे वेतन व एकूण वेतन संरक्षित करण्यात येत आहे.

५. श्री. सुरेंद्र ठाकरे यांची सेवा महानगरपालिकेकडे कायम स्वरुपी वर्ग झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून महानगरपालिकेत समावेशनांच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत निवृत्त वेतनाच्या दायित्वाची रक्कम महानगरपालिकेस द्यावी लागेल.

६. श्री. सुरेंद्र ठाकरे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे भविष्य निर्वाह निधीचे सदस्य असल्याचे त्यांचे भविष्यनिर्वाह खाती समावेशनाच्या दिनांकापर्यंत जमा असलेली रक्कम वसई विरार शहर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यांत यावी.

७. श्री. सुरेंद्र ठाकरे यांच्या वसई विरार शहर महानगरपालिकेकडील प्रतिनियुक्ती कालावधीचे रजा वेतन, अंशदान व निवृत्ती वेतन अंशदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास भरण्यांत यावे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने श्री.ठाकरे यांना वसई विरार शहर महानगरपालिकेत शाखा अभियंता या समकक्ष पदावर सामावून घेण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडे दि.१९/१२/२०१९ रोजी सादर केलेला होता.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य प्रशासकिय अधिकारी, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, नवि मुंबई यांचेकडील आदेश क्र. मजीप्रा-२०१९/ प्र.क्र. ११९/आ-६, दिनांक ११/०१/२०२१ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर असलेले शाखा अभियंता श्री. सुरेंद्र ठाकरे यांना महानगरपालिकेत कायम स्वरुपी समाविष्ट करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता दिलेली आहे.

अटी व शर्ती

१. श्री. सुरेंद्र ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य) यांना वसई विरार शहर महानगरपालिकेत सामावून घेतलेल्या दिनांकापासून ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झाले, असे समजण्यांत येईल.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २८/४/१९८१ अनुसार श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), यांचे वसई-विरार शहर, महानगरपालिकेत कायम समावेशाच्या लगतपुर्वीच्या दिनांकास त्यांच्या अर्जित रजेच्या खात्यात जमा असलेली अर्जित रजेचे, रजा वेतन एवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वसई विरार शहर महानगरपालिकेला प्रदान करील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम ६७ व नियम ११० नुसार असलेल्या निवृत्तीविषयक लाभास श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), हे पात्र ठरतील.

४. श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), यांची सेवा महानगरपालिकेकडे कायम स्वरुपी वर्ग झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून वसई-विरार शहर, महानगरपालिकेत समावेशनांच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत निवृत्ती वेतनाच्या दायित्वाची रक्कम वसई विरार शहर, महानगरपालिकेस देण्यात येईल.

५. श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या भविष्य निर्वाह निधीचे सदस्य असल्याने त्यांचे समावेशनाच्या लगतपूर्वीच्या दिनांकास भविष्य निर्वाह खाती जमा असलेली रक्कम वसई विरार शहर, महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात येईल.

६. श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), यांचे कायम समावेशन वसई विरार शहर महानगरपालिकेने त्यांना देण्यात येणाऱ्या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येईल व त्या दिनांकापासून ते प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झाले, असे मानण्यात येईल. त्यांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत कोणताही हक्क राहणार नाही.

७. श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), यांचे वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कायम समावेशनाच्या दिनांकापासून त्यांचे अर्जित रजा संबंधित दायित्व वसई विरार शहर, महानगरपालिकेचे राहील.

८. श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), यांचे कायम समावेशनाच्या लगतपुर्वीच्या दिनांकापर्यंतचे वसई विरार शहर, महानगरपालिकेकडील प्रतिनियुक्ती कालावधीचे रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास भरणा करावा लागेल.

९. निवृत्ती वेतन, रजा वेतन इत्यादीबद्दल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे भरलेल्या अंशदानांच्या बाबतीत, श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य) अथवा वसई विरार शहर, महानगरपालिका यांचा कसलाही मालकी हक्क असणार नाही आणि परताव्याच्या कोणत्याही मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

१०. श्री.सुरेंद्र एकनाथ ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य), हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गट बचत योजनेचे सभासद राहू शकत नाही. त्यामुळे त्यांचे कायम समावेशनाच्या लगतपुर्वीच्या दिनांकास बचत भागाचे त्यांना प्रदान करण्यात येईल.

उपरोक्त आदेशातील अटी व शर्तीनुसार तसेच मा. महासभा ठराव क्र.१२, दि.१३/१२/२०१९ अन्वये श्री. सुरेंद्र ठाकरे यांना महानगरपालिकेच्या रिक्त शाखा अभियंता (स्थापत्य) या समकक्ष पदावर सद्या आहरीत करीत असलेली त्यांची वेतनश्रेणी व वेतन संरक्षित करुन दि.१२/०१/२०२१ पासून महानगरपालिका सेवेत सामावून घेणे आवश्यक आहे.

ठराव :- मा.महासभा ठराव क्र.१२, दि.१३/१२/२०१९ व मुख्य प्रशासकिय अधिकारी, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, नवि मुंबई यांचेकडील आदेश क्र. मजीप्रा-२०१९/ प्र.क्र. ११९/आ-६, दिनांक ११/०१/२०२१ मधील अटी व शर्ती विचारात घेता श्री. सुरेंद्र ठाकरे यांना महानगरपालिकेच्या रिक्त शाखा अभियंता (स्थापत्य) या समकक्ष पदावर सद्या आहरीत करीत असलेली त्यांची वेतनश्रेणी व वेतन संरक्षित करुन दि.१२/०१/२०२१ पासून महानगरपालिका सेवेत खालील अटी व शर्तीनुसार सामावून घेणेत येत आहे.

अटी व शर्ती

१. श्री. सुरेंद्र ठाकरे, शाखा अभियंता (स्थापत्य) यांना वसई विरार शहर महानगरपालिकेत शाखा अभियंता (स्थापत्य) या पदावर सामावून घेतलेल्या दिनांकापासून ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झाले असे समजण्यांत येईल.

२. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील दिनांक २८/०४/१९८१ च्या शासन निर्णयानुसार श्री. सुरेंद्र ठाकरे यांच्या महानगरपालिकेत कायम समावेशाच्यानंतरची दिनांक व प्राधिकरणाकडील त्यांच्या खात्यात जमा असलेली अर्जीत रजा कायम समावेशानंतर वसई विरार शहर महानगरपालिकेतील त्यांच्या खात्यात जमा करण्यांत येईल, व त्याच्या मोबदल्यात त्यांच्या कायम समावेशनाच्या दिनांकाला प्राधिकरणाकडील त्यांच्या खाती शिल्लक असलेल्या अर्जीत रजेच्या रजा वेतनाऐवढी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वसई विरार शहर महानगरपालिकेला अदा करील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम ६७ व नियम क्र. ११० नुसार असलेल्या निवृत्तीविषयक लाभास ते पात्र ठरतील.

४. श्री. सुरेंद्र ठाकरे यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील सेवा, त्यांचे सद्याचे वेतन व त्यांची सद्याची वेतनश्रेणी संरक्षित करण्यात येत आहे.

५. श्री. सुरेंद्र ठाकरे यांची सेवा महानगरपालिकेकडे कायम स्वरूपी वर्ग झाल्यानंतर त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून महानगरपालिकेत समावेशनांच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिनांकापर्यंत निवृत्त वेतनाच्या दायित्वाची रक्कम महानगरपालिकेस द्यावी लागेल.

६. श्री. सुरेंद्र ठाकरे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे भविष्य निर्वाह निधीचे सदस्य असल्याचे त्यांचे भविष्यनिर्वाह खाती समावेशनाच्या दिनांकापर्यंत जमा असलेली रक्कम वसई विरार शहर महानगरपालिकेकडे वर्ग करण्यांत यावी.

७. श्री. सुरेंद्र ठाकरे यांच्या वसई विरार शहर महानगरपालिकेकडील प्रतिनियुक्ती कालावधीचे रजा वेतन, अंशदान व निवृत्ती वेतन अंशदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास भरण्यांत यावे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६१३ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- १६/३/2021

प्रस्तावाचा विषय :- १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Million Plus Cities अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील एअर क्वॉलीटीसाठीच्या बंधनकारक अनुदानाच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील एअर क्वॉलीटी सुधारणाकामी तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार कामे हाती घेण्यासाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील Million Plus Cities अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिकेचा समावेश महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एफएफसी २०२० /प्र.क्र.५६/नवि-४ दि.२८ ऑक्टोंबर, २०२० अन्वये झाला आहे. "सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील एअर क्वॉलीटीसाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एफएफसी २०२० /प्र.क्र.८६/नवि-४ दि.९ नोव्हेंबर, २०२० अन्वये राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) साठी बंधनकारक (Tied) अनुदानाचा पहिला हप्ता रू. १६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी महापालिकेस दि.१८/११/२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

वरील प्रमाणे प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने महापालिकेने सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात हवा गुणवत्ते (Air Quality) साठी मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.ली. यांच्याकडून तयार करून घेण्यात आलेला कृती आराखडा (Action plan) जा.क्र. वविशम/बांध/ ६२४/२०२०-२१ दि.११/१२/२०२० अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला असता सदर कृती आराखड्यास केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिल्याबाबत दि.१० मार्च, २०२१ रोजी १२.३० वा. झालेल्या वीडीओ कॉन्फरन्स मध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत सांगण्यात आले व सदर कृती आराखड्यातील कामे तातडीने हाती घेण्यासाठी खर्चास सक्षम आर्थिक व प्रशासकीय मान्यता घेऊन सदर ठरावाची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर कामे निश्चित कालमर्यादेच्या आत केल्यास शतमाण अंकतालीकेत उच्चतम गुण मिळविणा-या स्थानिक स्वराज्य संस्थाना प्राप्त होणा-या गुणानुसार सन २०२१/२२ या आर्थिक वर्षात शासन अनुदान वितरीत करण्यात येणार आहे.

महापालिकेच्या Clean Air कृती आराखड्यात खालील कामांचा समावेश करण्यात आला आहे.

Sr. No.	Mitigation Measures	No of Unit	Rate	Amount	Implement Department
A	**Control of Vehicular Emission & Traffic Improvement Measures**				
१	Procurement of Hybrid Electric Bus	२	२००००००	४००००००	Vehicle/ Transport Dept.
२	Procurement of CNG Bus	१७	४००००००	६८००००००	
३	Pay & Park Facility behind VVCMC Head Office	१	६६००००००	६६००००००	P.W.D
			Sub Total	**१७४००००००	
B	**Resuspension**				
४	Creation of the Green Zone by Miyavaki Method	४	४२५००००	१७००००००	Garden & Tree Auth.Dept.
			Sub Total	**१७००००००	
C	**Re-suspension of Road Dust & Other Fugitive Emission**				
५	Vacuum Mechanical Sweeping	२	६००००००	१२००००००	Vehicle/ Transport Dept.
६	Water Fountains for Major Traffic Intersections	६	३००००००	१८००००००	P.W.D & Garden
७	Wind Augmentation Purifying Unit (WAYU) By CSIR	१२	४०००००	४८०००००	P.W.D
			Sub Total	**३४८०००००	
D	**Control of Air Pollution from Bakeries/ Crematoria**				
८	LPG/PNG Process in Crematorium	८	१०५०००००	**८४०००००**	P.W.D
E	**City Specific Action**				
९	Air Monitoring System	३	३५०००००	**१०५०००००	P.W.D
		Total (A+B+C+D+E)		**३२०३०००००	

वरील **A** मधील १) Procurement of Hybrid Electric Bus व २) Procurement of CNG Bus तसेच **C** मधील ५) Vacuum Mechanical Sweeping ही वाहने खरेदी वाहन विभागामार्फत करून घेणे शक्य असून **B** मधील ४) Creation of the Green Zone by Miyavaki Method ची कामे उद्यान/वक्ष प्राधिकरण विभागामार्फत करून घेणे आवश्यक आहेत . तसेच इतर सर्व कामे सार्व. बांधकाम विभागामार्फत करणे शक्य आहे. वरील प्रामणे कृती आराखड्यातील कामांसाठी रू. ३२,०३,००,०००/- इतका खर्च अपेक्षीत असून या कामांची सविस्तर अंदाजत्राके तयार करणे व सर्व कामांच्या स्व:तंत्र निविदा तयार करण्याची कामे सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.ली. यांचेमार्फत सुरू आहेत.

महापालिकेच्या सन २०२०/२१ च्या सुधारीत अर्थसंकल्पातील भाग दोन भांडवली खर्चात "१५ व्या वित्त आयोग मिलीयन प्लस सिटी एअर क्वॉलीटी अनुदानासह" या लेखाशिर्षावर रू.३२ कोटीची तरतूद करण्यात आली असून सन २०२१/२२ च्या

अर्थसंकल्पात रू. ३० कोटी खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. सदर खर्च वरील लेखाशिर्षातून भागविणे शक्य आहे.

उपरोक्त प्रस्तावास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार मा.सर्वसाधारण सभेला असून सद्य:स्थिती शासनाने महापालिकेवर प्रशासक म्हणून मा.आयुक्त यांची नियूक्ती केली आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक यांना सदर प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार निहित असल्याने १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार Million plus Cities अंतर्गत सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील एअर क्वॉलीटीसाठीच्या बंधनकारक अनुदानाच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील एअर क्वॉलीटी सुधारणाकामी तयार केलेल्या कृती आराखड्यानुसार कामे हाती घेण्यासाठी येणाऱ्या रू. ३२,०३,००,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव सादर.

ठराव :-

१. शासन निर्णय दि.९ नोव्हेंबर, २०२० अन्वये राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (National Clean Air Programme) अंतर्गत हवा गुणवत्ते (Air Quality) साठी बंधनकारक (Tied) अनुदानाचा पहिला हप्ता रू. १६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी महापालिकेस दि.१८/११/२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

२. सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.ली. यांनी वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील हवा गुणवत्तेसाठी (Air Quality) तयार केलेल्या रू.३२.०३ कोटीच्या कृती आराखड्यास केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने मान्यता दिल्याचे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने VC दरम्यान आश्वासित केले आहे.

३. वरील प्रमाणे प्राप्त मंजूरीस अधिन राहून तसेच महापालिकेस प्राप्त झालेल्या / प्राप्त होणाऱ्या अनुदानाचा विनियोग कृती आराखड्यातील उल्लेखीत कामांसाठी होण्याच्या दृष्टीने रू.३२.०३ कोटीच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून कामांच्या आवश्यक्तेनुसार (B/१ किंवा B/२ प्रकारच्या) स्वतंत्र निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.ली. यांनी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हवा गुणवत्तेसाठी (Air Quality) तयार केलेल्या कृती आराखडा, अंदाजपत्रके, आराखडे यांना सक्षम तांत्रिक मान्यता घेवून प्रस्तावात उल्लेखीत **A** मधील १) Procurement of Hybrid Electric Bus व २) Procurement of CNG Bus तसेच **C** मधील ५) Vacuum Mechanical Sweeping ही वाहने खरेदी वाहन विभागामार्फत ई-निविदा मागवून करावीत तसेच **B** मधील ४) Creation of the Green Zone by Miyavaki Method ची कामे वृक्ष प्राधिकरण विभागामार्फत ई-

निविदा मागवून करण्यात यावीत तसेच उर्वरित सर्व कामे सार्व. बांधकाम विभागाने ई-निविदा मागवून पूर्ण करावीत.

५. या प्रकल्पाअनुषंगाने शासनाच्या निर्देशानुसार आयुक्त वसई-विरार शहर मनपा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यास तसेच याप्रकल्पासाठी नोडल ऑफीसर म्हणून अति. आयुक्त श्री. संतोष देहेरकर यांची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सल्लागार मे. टंडन अर्बन सोल्युशन प्रा.ली. यांना याकामी पी.एम.सी. म्हणून नेमणूक करण्यास व मा.स्थायी समिती सभा दि.९/०३/२०११ च्या ठराव क्र. ९ नुसार मंजूर दरा प्रमाणे त्यांचे देयक अदा करण्यास व सदर खर्च मनपा स्व: निधीतून करण्यासह वरील कामी होणा-या एकूण खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

16/3/2021

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

पू/229

वसई – विरार श.. महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 614

विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : 16 /03/ 2021

मुख्य प्रस्तावाचा विषय	:-	वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ८८ मध्ये फादरवाडी, चिंचपाडा येथे विनायक कृपा सोसा. ते हनुमान मंदिर ते शांतीपाडा ते प्रिती मेटल ते अपोलो इंड. गिता उद्योग इंड. येथे रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.
मुख्य प्रस्तावाचा मजकूर	:-	अंदाजपत्रकीय रक्कम : - रू. ७७,६०,२३१/-
		प्रशासकीय मंजूरी :- मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. २५, दि.१६/०२/१९
		ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :- ववि‍शम/शअ/बांध/६४९/२०१९-२०, दि. ०१/०३/२०१९
		वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा १) दै. जागरूक टाईम्स, २) दै. हमारा महानगर, ३) दै. नरवीरा, ४) दै. नवाकाळ, ५) दै. यशोभूमी, ६) दै. प्रहार, ७) दै. डि एन ऐ, दि. ०२/०३/२०१९
		ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी : - ववि‍शम/शअ/बांध/१४८/२०१९-२०, दि. ०३/०७/२०१९
		वृत्तपत्रातील प्रथम वेळ फेर जाहिर निविदा : - १) दै. जागरूक टाईम्स, २) दै. हमारा महानगर, ३) दै. नरवीर चिमाजी, ४) दै. डी एन ऐ, ५) दै. सकाळ, ६) दै. लोकमत, ७) दै. मिड डे, दि. ०४/०७/२०१९
		ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी : - ववि‍शम/शअ/बांध/४१०/२०१९-२०, दि. २८/०८/२०१९
		वृत्तपत्रातील द्वितीय वेळ फेर जाहिर निविदा : - १) दै. ऊर्दू, २) दै. लोकमत, ३) दै. जन खुलासा, ४) दै. द इकॉनॉमिक्स टाइम्स, ५) दै. हमारा महानगर, ६) दै. द. फ्रि प्रेस, ७) दै. सामना, दि. २९/०८/२०१९
		ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रिपरेशनची दिनांक : - दि. १८/०७/२०१९
		ई-टेंडरींगद्वारे निविदा स्विकारण्याची दि : - दि. २०/०७/२०१९, ३.०१ वाजता
		विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेद्वारे प्राप्त निविदा :- ०३
		ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.01 उघडण्याची तारीख :- दि. १६/०९/२०१९
		ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.02 उघडण्याची तारीख :- दि. २०/१२/२०१९
		प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- 1. कार्यकारी अभियंता 2. शहर अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.02 मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१.	मे. सुरेश एंटरप्रायझेस	(-) ७.७७%	--	
२.	मे. द्वारका कन्स्ट्रक्शन	(-) ११.००%	--	
३.	मे. सी. एस. मोहीते	(-) ११.११%	डी.डी. पावती क्र. ३५६२३३ दि. २३/०१/२०२०	
४.	मे. मेघना एंटरप्रायझेस	(-) ८.४०%	--	

निर्णय :- सदर विषयाबाबत निविदा सभेत चर्चा करण्यात आली. सदर कामी ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ०४ पैकी सर्व निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त् ०४ पैकी सर्व निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक **मे. सी. एस. मोहीते यांच्या (-) ११.११ % कमी** दराच्या निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट् महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे तसेच त्याअनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार पूर्व,जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी-०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल

प्रशासकीय ठराव क्र. ६९५ **विभाग – बांधकाम विभाग**

दिनांक-- १६/३/२०२१

मुख्य प्रस्तावाचा विषय -- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. ११५ मध्ये कामण खिडीपाडा स्मशानभुमी मध्ये शेड व शौचालय बांधणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर --

अंदाजपत्राकीय रक्कम	--	रु. २०,९३,३९७/-
प्रशासकीय मंजूरी	--	मा. सर्वसाधारण सभा वि/ ठराव क्र.१२ दि. २०/०६/२०१९
ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्धी	--	वविशम/ पापु/ ३७३/२०१९ दि. २३/०८/२०१९
वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	--	दि. २४/०८/२०१९
वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक	--	दै. आपला महासागर, दै. फ्रि प्रेस जर्नल, दै. नवभारत दै. दै. मिड डे, दै. हिंदमाता मिरर , दै. प्रहार, दै. पुर्णविराम
ई-टेंडरींगव्दारे निवीदा प्रीपेरशनची तारीख	--	दि. / /२०२०
विहीत मुदतीत ऑनलाईन प्राप्तनिवीदा	--	५
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	--	
ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	--	दि.३०/०१/२०२०
प्राप्त निवीदा उघडणारे अधिकारी	--	शहर अभियंता

विहीत मुदतीत खालीलप्रमाणे निवीदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र.२ मध्ये प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटीबाबत धनाकर्ष तपशील	शेरा
१	मे. अंजनी कंन्स्ट्रक्शन	११.११% कमी दराने	--	
२	मे. नितेश मोहन मलवानी	१.००% जादा दराने	--	
३	मे. रोहन किशन मोहिते	१६.००% कमी दराने	--	
४	मे. श्री. गणेश कंन्स्ट्रक्शन	१८.००% कमी दराने	--	
५	मे. सुरेश एंटरप्रायजेस	२.००% जादा दराने	--	

निर्णय :- सदर विषयाबाबत निविदा सभेत चर्चा करण्यात आली. सदर कामी ५ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ५ पैकी सर्व निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. प्राप्त ५ पैकी सर्व निविदा प्राप्त असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदाधारक **मे. श्री. गणेश कंन्स्ट्रक्शन** यांच्या १८.००% कमी दराच्या निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निविदा दरास मान्यता देण्यात येत असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणे तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

16/3/2024

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

विभाग :- घनकचरा व्यवस्थापन

प्रशासकीय ठराव क्र. ६३६

दिनांक :२६/03/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निर्माण होणाऱ्या प्लास्टिकजन्य कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करुन श्रेडर्स मशीन खरेदी करुन मिळणेबाबात.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र हे पालघर जिल्हयातील सर्वात मोठे शहर असून बृहन्मुंबईच्या उत्तरेकडे वसलेले शहर आहे. या शहराच्या बाजूला मिरा भाईंदर, भिवंडी कल्याण या सारखी मोठी शहरे वसली आहेत. वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जूलै २००९ मध्ये चार नगरपरिषदा आणि ५३ ग्रामपंचायती मिळून झाली आहे. मनपाचे एकूण क्षेत्रफळ ३११ चौ.कि.मी. एवढे विस्तीर्ण क्षेत्रफळ आहे. २०११ च्या जनगणेनुसार शहराची लोकसंख्या १२.२२ लक्ष इतकी आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहराच्या लगतचे शहर म्हणून या शहराची वाढ होत असून शहराची लोकसंख्या अंदाजे २० लक्ष पर्यंत गेली आहे. त्यामुळे शहरामध्ये दर दिवशी ६५० टन इतक्या कचऱ्याची निर्मिती होत आहे. सदरील कचऱ्यामध्ये मोठया प्रमाणामध्ये प्लास्टिकजन्य वस्तु आढळतात. सदर वस्तुमुळे कचऱ्याचे आकारमान तर वाढतेच परंतु सदर वस्तुवर शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे जागेच्या अभावी व खर्चीक असल्यामुळे शक्य नाही.

तथापी केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शहरातील निघणारा दैनंदिन कचऱ्याचे ओला व सुका कचरा असे वर्गीकरण करुन त्यांच्यावर प्रक्रिया करण्याच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभाग निहाय दैनंदिन कचरा संकलन करताना ओला व सुका कचरा असे वर्गीकरण केले जाते. त्यामुळे सदर प्लास्टिकजन्य व इतर कचऱ्याचे बारीक तुकडे करणे किंवा सदर वस्तुंना Compress करुन त्यांचे आकारमान कमी करता येईल किंवा कच्चा माल म्हणून ईच्छूक कंपनीस विकता येऊ शकतो. त्यामुळे सदर प्रक्रिया पूर्ण करणे करीत खालील प्रमाणे मशीनींची आवश्यकता आहे.

अ.क्र	प्रस्तावित मशीनचे नाव	खरेदी करावयाच्या मशिनची संख्या	अंदाजीत प्रति मशीन दर (GST सह)
१	श्रेडर्स मशीन (१० TPH क्षमता)	१	रु.९५,००,०००/-
एकुण			रु.९५,००,०००/-

वसई - विरार शहर महानगरपालिका महानगरपालिका सचिव

यापूर्वी ६० TPD या क्षमतेच्या श्रेडर मशीन खरेदीचे प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्यात आली होती. तथापी मा.आयुक्त यांनी १० TPH क्षमतेची एक मशीन प्रायोगिक तत्वावर घेणेविषयी निर्देश दिले आहेत. त्यानुसार वरीलप्रमाणे श्रेडर्स मशीन खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाच्या Gem portal वरुन खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु Gem Portal वर उपलब्ध असणाऱ्या श्रेडर्स मशीनची क्षमता महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या क्षमतेशी जुळत नाही. तरी वसई विरार शहर महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या मशीनची क्षमता हि १० TPH एवढी आवश्यक असल्याने सदरील श्रेडर्स मशीन Gem portal वर उपलब्ध नाही. याकामी दि.०१/०२/२०२१ रोजीचा Gem Portal वरील खरेदीचा प्रस्ताव रद्द करुन ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे योग्य वाटत असल्याने श्रेडर्स मशीनसाठी अंदाजे **रक्कम रु.९५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंच्याण्णव लक्ष मात्र)** खर्च अपेक्षीत आहे. सदरील खर्च सन २०२०-२१ या वित्तीय वर्षातील **लेखाशिर्ष साफसफाई साहित्य खरेदी** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद **रक्कम रु.५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निर्माण होणाऱ्या प्लास्टिकजन्य कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करुन १ नग श्रेडर्स मशीन खरेदी करणेकामी व त्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकांची मंजूरी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

<u>ठराव निर्णय :-</u>

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील निर्माण होणाऱ्या प्लास्टिकजन्य कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणेकामी ई-निविदा प्रक्रिया करुन १ नग श्रेडर्स मशीन खरेदी करणेकामी व त्यासाठी होणाऱ्या अंदाजीत खर्च **रक्कम रु.९५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु.पंच्याण्णव लक्ष मात्र)** एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रशासक / आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
महानगरपालिका सचिव

सत्य प्रत

महानगरपालिका सचिव
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६४७

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ४७/०३/२०२१

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत आवश्यकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा करणेकामी येणाऱ्या आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महापालिका क्षेत्र ३११ चौ.कि.मी. इतके विस्तारित असून महापालिका क्षेत्रात ग्रामिण भागाचा समावेश आहे. सदर ग्रामिण भागासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत ६९ गावांची पाणी पुरवठा येजनेची अंमलबजावणी सन २००८ पासून करण्यांत आली असून सदर योजनेतील PVC जलवाहिन्या नादुरूस्त झाल्याने कामण, चिंचोटी, कोल्ही, देवदळ, ससुनवघर इत्यादी गावांना अद्याप सदर योजनेतून पाणी उपलब्ध होत नाही. किंवा अन्य कोणत्याही योजनेतून पाणी पुरवठा केला जात नाही. सदर गावांतील तसेच महानगरपालिका क्षेत्रातील अन्य काही भागात जलवाहिन्या अंथरल्या नाहीत अशा भागातील नागरीक विहीरी व सार्व. बोअरवेलच्य पाण्यावर आपली गरज भागवित आहेत.

उन्हाळ्याच्या दिवसात भूजलाची पातळी खाली गेल्याने पाणी टंचाई सदृष्य परिस्थिती उद्भवत असते अशा टंचाई काळात पाणी टंचाई भागात महापालिकेने यापुर्वी स्व:खर्चाने नागरीकांना पिण्याचे पाणी टॅकरव्दारे पुरवठा करून त्यांची गरज भागविली आहे. मागील वर्षी वार्षिकरित्या टँकरव्दारे पाणी पुरवठा करणे कामी निविदा मागविण्यात आली असून सदर निविदेअंतर्गत पॅनलवरील ठेकेदारामार्फत पाणी टंचाई भागात तसेच कोव्हीड-१९ विलगीकरण केंद्र, वालिव तसेच म्हाडा येथे पाणी पुरवठा करण्यांत आला आहे.

सद्य:स्थितीत ६९ गावांच्या पाणी पुरवठा योजनेतील महापालिकेत समाविष्ट गावांच्या पाणी पुरवठा अनुषंगाने नव्याने जलवाहिन्यां खरेदी करून अंथरण्याची तसेच जलकुंभाचे रचनात्मक परिक्षण करून प्राप्त अहवालानुसार कारवाई करणे ही कामे हाती घेतली आहेत.

६९ गावांपैकी महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट सर्व गावांत जलवाहिन्यांव्दारे पाणी पुरवठा करण्यास सुमारे डिसेंबर २०२१ पर्यंत कालावधी लागणे अपेक्षित आहे त्यामुळे सदर कामी टँकरव्दारे पाणी पुरवठा करणेसाठी नविन ठेका काढून निविदा मागविणे आवश्यक आहे. परंतू आगामी येणाऱ्या महापालिकेची निवडणूक लक्षात घेता सदर निविदा मागवून मंजूरीस विलंब झाल्यास नागरीकांची पिण्याच्या पाण्याकरीता गैरसोय निर्माण हाईल. त्यामुळे नविनल वार्षिक ठेका मंजूर होत नाही तो पर्यंत मागील वर्षीचे मंजूर ठेकेदार मे. एस एन्टरप्रायजेस व मे. अफताब इन्फ्रा यांना पॅनलवर नियुक्त करण्यात आले असून सदर ठेक्याची मुदत मार्च २०२१ पर्यत आहे.

मागील वर्षाचा ई-निविदा मंजूर दर	
प्रभाग समिती A	रु. १,९४५/-
प्रभाग समिती B	रू. १,७९५/-
प्रभाग समिती C	रू. १,७९५/-
प्रभाग समिती D	रू. १,७९५/-
प्रभाग समिती E	रू. १,७९५/-
प्रभाग समिती F	रू. १,७९५/-
प्रभाग समिती G	रू. १,७९५/-
प्रभाग समिती H	रु. १,९४५/-
प्रभाग समिती I	रू. १,९९५/-

सद्य:स्थितीत सदर ठेक्या अंतर्गत कोव्हिड-१९ व लांबलेल्या पावसाळ्यामुळे पाणी टंचाई भागात टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यांत आला असून सुमारे १.५० कोटी रूपये खर्च झाला आहे. तरी सदर मंजूर ठेक्यास मुदतवाढ देण्यास व खर्चास मान्यता आवश्यक आहे.

उपरोक्त विषयांकीत कामी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात रक्कम रू.७०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च हा "टँकरव्दारे पाणी पुरवठा" या लेखाशिर्षातून भागविणे शक्य आहे. यासाठी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात आवश्यक ती तरतुद अर्थसंकल्पीय लेखाशिर्षावर करण्याची कार्यवाही विभागामार्फत करण्यात येईल.

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत आवश्यकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा करणेकामी बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास तसेच अनुषंगीक कामी येणाऱ्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सविनय सादर.

.....

ठराव :-

१. महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्भुत ग्रामिण भागात उन्हाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी टंचाई काळात तसेच महापालिकेस आवश्यकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा करणेकामी अंदाजीत रू.७०,००,०००/- खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून बी/२ प्रकारची निविदा मागविण्यास व पॅनल तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. टँकरने पाणी पुरवठा कामी मा. स्थायी समिती सभा दि.११/०९/२०१९ ठराव क्र.३१३ अन्वये मंजूर असलेल्या वार्षिक ठेक्यास वरील प्रमाणे नविन पॅनलवरील ठेकेदारांची नियुक्ती होईपर्यंत किंवा पुढील ६ महिने यातील जी कार्यवाही आधी होईल त्यास व मंजुर दरानुसार येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. मा. स्थायी समिती सभा दि.११/०९/२०१९ ठराव क्र.३१३ अन्वये मंजूर असलेल्या वार्षिक ठेक्याअंतर्गत मागील वर्षी पाडे, वस्त्या / गावांमध्ये तसेच कोवीड-१९ केंद्रांना टँकरने पाणी पुरवठा केल्याने याकामी खर्चात वाढ झाली असून सदर वाढीव खर्चासह एकुण रू.२.०५ कोटी खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : ४७/०३/२०२४

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ६४८

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये नानोडी क्रॉस ते राजेश डायस यांच्या घरापर्यंत पाईप गटार बनविणे व रस्ता डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.९,३५,०९६/-
२) प्रशासकीय मंजूरी :- मा.आयुक्तांची मंजूरी दि.१८/०७/२०१९
३) तांत्रिक मान्यता :- मा.कार्यकारी अभियंता दिनांक. ०२/०८/२०१९
४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.९,३५,०९६/-
५) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक :- दि.३०/०८/२०१९
६) वृत्तपत्राचे नाव :- १) दै. प्रहार
२) दै.मिड-डे
३) दै. पुर्णविराम
७) ई-निविदा प्राप्त :- ३
८) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१७/९/२०१९
९) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२०/१२/२०१९
